प्रकरण दोन

# गुन्हेगारी मानसशास्त्र : गुन्हेगारी वर्तनाचा उगम आणि वैकासिक जोखीम घटक

# (Criminal Psychology : Origins of criminal behavior and developmental risk factors)

**डॉ. भरत नाईक**
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

**डॉ. राहुल कांबळे**
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

---

- **गुन्हा म्हणजे काय ? (What is crime?)**
- **गुन्हेगारी वर्तन म्हणजे काय? (What is criminal behavior?)**
- **गुन्हेगारीशास्त्रातील बहुशाखीय दृष्टीकोण (Disciplinary perspective in criminology)**
- **जोखीम घटक म्हणजे काय? (What is risk factor)**

## 2.1 सामाजिक वातावरण जोखीम घटक (Social environment risk factors)

**अ) समवयस्कांचे नाकारणे आणि समाजविरोधी जोडीदाराशी संबंध**

**(Peer rejection and association with antisocial peers)**

1) काही बालकांना त्याच्या समवयस्कांद्वारे का नाकारले जाते?
   (Why are some children rejected by their peers?)
2) समन्वयकांनी नाकारणे व लिंगभेद
   (Gender difference in peer rejection)
3) नाकारलेल्या तरुणांवर टोळी / विचलित समूहाचा होणारा परिणाम
   (Gang or deviant group influences on rejected youth)

## 2.2 पालकत्व आणि कौटुंबिक जोखीम घटक (Parental and family risk factors)

**अ) पालकत्व शैली आणि कौशल्ये/पालन पोषण पद्धती (Parental styles and practices)**

1. पालकत्व शैलीचे प्रकार (Types of parental style)
2. मत्सर आणि हलक्या/निम्न दर्जाची पालकत्व शैली (Enmeshed and lax parental style)

**ब) पालकांची निगराणी (Parental monitoring)**

**क) पालकांचे मानसिक आजारपण (Parental psychopathology)**

## 2.3 मानसशास्त्रीय जोखीम घटक (Psychological risk factors)

**अ) जवळीकतेचा अभाव (Lack of attachment)**

1. सुरक्षित जवळीकता (Secure attachments)
2. असुरक्षित जवळीकता (Insecure attachment)

**ब) परानुभूती / तदनुभूतीचा अभाव (Lack of empathy)**

**क) अवधान दोष अतिक्रियाशीलता विकृती (Attention Deficit Hyperactivity Disorder - ADHD)**

**ड) आचरण विकृती (Conduct disorder)**

**इ) विरोधी बेफिकिरी वर्तन (Oppositional Defiant Disorder – ODD)**

## प्रास्ताविक (Introduction)

दैनंदिन जीवनात आपण दररोज टी.व्ही., वर्तमानपत्रे व इतर सोशल मीडियावर गुन्हा घडल्याची एक ना एक तरी बातमी पाहतो. उदाहरणार्थ खून, दरोडा, लैंगिक हिंसा इत्यादी या प्रकरच्या घटनांमुळे व्यक्तीच्या मनामध्ये भीती निर्माण होते. विशेषतः तेव्हा, जेव्हा अशी एखादी घटना आपल्या सोबतही घडेल असे वाटते. त्याचबरोबर अशा प्रकारच्या घटनांमधून आपल्या एखाद्या प्राण्यांची, माणसाची हत्या किंवा आर्थिक फसवणूक होते. तेव्हा माणसांमध्ये हिंसकता वाढते. उदा. 25 मे 2020 रोजी जॉर्ज फ्लॉइड (George Floyd) या तरुणाला खोट्या $20 डॉलरची नोट किराणा दुकाना मध्ये वापरताना पोलिसांनी पकडले. या पोलिसांनी साधारणतः नऊ मिनिटे जॉर्जच्या मानेवर गुडघा दाबल्याने जॉर्जचा मृत्यू झाला. ही घटना सार्वजनिक ठिकाणी घडली. या घटनेमुळे यु.एस मध्ये चारशेहून अधिक शहरांमध्ये व जगभर लोकांमध्ये हिंसकता दिसून आली. अशा अनेक घटना आहेत जसे पुतळयांची विटंबना, लहान मुलींचा लैंगिक छळ, व्यापाऱ्यांची लूट, जातीय हिंसकता इत्यादी व अनेक त्यामुळे या प्रकारच्या घटनांचा अभ्यास करण्यासाठी गुन्हा, गुन्हेगारी वर्तन म्हणजे काय? व गुन्हेगारी मानसशास्त्राची यातील भूमिका समजून घेणे गरजेचे आहे.

❖ **गुन्हा म्हणजे काय ? (What is crime?)**

**कायद्याचे पालन करण्यात अपयशी ठरणे किंवा त्याचे उल्लंघन करणे, आणि ज्यासाठी शिक्षेची तरतूद असेल त्याला गुन्हा असे म्हणतात अशी गुन्ह्याची कायदेशीर व्याख्या करता येईल** (Legally it is defined as conduct or failure to act violation of the law forbidding commanding it, and for which a range of possible penalties exist upon convection).

❖ **गुन्हेगारी वर्तन म्हणजे काय? (What is criminal behavior?)**

**गुन्हेगारी दंडसंहितेचे उल्लंघन करणारे वर्तन म्हणजे गुन्हेगारी वर्तन होय** (Criminal behavior is behavior in violation of the criminal code).

❖ **गुन्हेगारीशास्त्रातील बहुआयामी दृष्टीकोण (Disciplinary perspective in criminology)**

**गुन्ह्याचा बहुशाखीय अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे गुन्हेगारी शास्त्र होय (Criminology is the multi-disciplinary study of crime).** गुन्हेगारी वर्तनाचा अभ्यास करताना गुन्हेगारी शास्त्रात इतर शास्त्रातील दृष्टिकोनांचाही आधार घेतला जातो. गुन्हेगारी वर्तनावर अनेक घटकांचा प्रभाव पडत असल्याने, गुन्हेगारी वर्तनाचे पद्धतशीर स्पष्टीकरण करण्यासाठी इतर शास्त्रांचा संदर्भ घ्यावा लागतो. यामध्ये समाजशास्त्र, मानसशास्त्र, मनोविकारशास्त्र आणि हल्लीच्या काही वर्षांमध्ये मानववंशशास्त्र, मज्जाशास्त्र आणि अर्थशास्त्र इत्यादी शास्त्रांचा समावेश होतो.

मात्र याठिकाणी, गुन्हेगारी वर्तना संदर्भात आपला भर मानसशास्त्रातील तत्वे, संकल्पना, सिद्धांत आणि संबंधित संशोधनावर आहे. त्यामुळे गुन्हेगारी समाजशास्त्र आणि गुन्हेगारी मानसशास्त्र यातील काही दृष्टीकोण समजून घेणे घेवूया.

**1. समाजशास्त्रीय गुन्हेगारीशास्त्र (Sociological Criminology)**

**गुन्ह्याशी संबंधित जैवभौतिकीय आणि समूह परिवर्त्यांतील संबंधाचा अभ्यास करणारे किंवा परीक्षण करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्रीय गुन्हेगारीशास्त्र होय** (Sociological criminology is the study of examine the relationship of demographic and group variable to crime). उदाहरणार्थ वय, लिंग, वंश, सामाजिक, आर्थिक दर्जा इत्यादी. या शास्त्रामुळे एखादी व्यक्ती किंवा समूह गुन्हेगारी विशिष्ट वर्तनाशी संबंधित आहे का? याबाबतचा निष्कर्ष काढता येतो. उदाहरणार्थ आफ्रिकन वंशाच्या तरुणांचा हत्येशी, तर पांढरपेशीय तरुणांचा राजकीय व पांढरपेशीय गुन्ह्यामध्ये समावेश दिसतो. तसेच गुन्हेगारी वर्तनासाठी पोषक ठरणाऱ्या परिस्थितीजन्य व वातावरणीय घटकांचा शोधही या शास्त्राद्वारे घेता येतो. उदाहरणार्थ वेळ ठिकाणी गुन्ह्यासाठी वापरली जाणारी शस्त्रे व त्या वेळची परिस्थिती इत्यादी.

हल्ली बरेच शास्त्रज्ञ रचनात्मक व सांस्कृतिक गटामध्ये विभागलेले दिसतात. गुन्ह्यासंदर्भात रचना तज्ञांचा कल, सामाजिक रचनेचे काही घटक जसे बेरोजगारी, शैक्षणिक सुविधा व आरोग्य सुविधांचा अभाव इत्यादीकडे दिसतो. तर सांस्कृतिक तज्ञांचा कल समूहातील सदस्यांची मुल्ये व जीवन पद्धतीकडे दिसतो. हल्लीच्या काही वर्षांमध्ये या दोन्ही समूहामध्ये काही मुद्यांवरून मतभेद असल्याचे स्पष्ट होते. विशेषतः अमेरिकन वंशाच्या मुद्द्यावरून (Sanneh, 2015). प्रस्तावने मधील उदाहरणावरून याचे चांगले स्पष्टीकरण होईल.

या शास्त्राचा आणखी एक फायदा म्हणजे, समाजातील असंतुलित सत्ता वितरणावर प्रकाश टाकणाऱ्या घटकांचा अभ्यास. उदाहरणार्थ रस्त्यावर बेकायदेशीरपणे अमली पदार्थाची होणारी विक्री, भ्रष्टाचार, लाचखोरी आणि सत्तेचा दुरुपयोग इत्यादी राजकीय गुन्हे अभ्यासही ही शाखा पुरविते. हल्ली मानसशास्त्रज्ञही या घटकांवर चांगल्या प्रकारे काम करत आहेत. याचबरोबर शैक्षणिक आणि नोकरीच्या संधीतील असमानता इत्यादी गुन्हेगारी वर्तनात चालना देणाऱ्या घटकांचा अभ्यासही ही शाखा करते. गुन्ह्याची नेमकी व्याख्या काय करावी? शिक्षेस कोण पात्र आहे? आणि श्रीमंत सामर्थ्यवान व्यक्तींवर होणारे गुन्हे इत्यादीवर प्रकाश टाकण्यात समाजशास्त्रातील 'संघर्ष सिद्धांत' (Conflict Theories) उपयुक्त ठरतात.

**2. मानसशास्त्रीय गुन्हेगारीशास्त्र (Psychological Criminology)**

**गुन्हा करणाऱ्या व्यक्तीच्या वर्तन आणि मानसिक प्रक्रियांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्रीय गुन्हेगारीशास्त्र होय** (Psychological Criminology is the sciences of the behavior and mental process of the person who commits the crime)

ज्या प्रकारे समूह आणि समुदायाचा गुन्हेगारी वर्तनावर होणारा परिणाम समाजशास्त्रीय गुन्हेगारीशास्त्र अभ्यासते त्याप्रमाणे मानसशास्त्रीय गुन्हेगारीशास्त्र वैयक्तिक गुन्हेगारी वर्तनावर भर देते. एखादी व्यक्ती गुन्हेगारी कशी बनते? (संपादन), कोणत्या घटकांनी प्रेरित होते, अशा वर्तनाची देखरेख व त्यात बदल कसा करावा? इत्यादीचा अभ्यास मानसशास्त्रीय गुन्हेगारीशास्त्र करते.

गुन्हेगारी वर्तनावर सामाजिक व व्यक्तिमत्त्व अशा दोन्ही घटकांचा प्रभाव होतो. असे ही शाखा गृहीत धरते. पण हल्ली गुन्हेगारांच्या व्यक्तीमत्वाबरोबरच, व्यक्तिगत आणि सामूहिक गुन्हेगारी वर्तनाबाबत ही शाखा सर्वप्रथम **बोधनिक** दृष्टिकोनावर, त्यानंतर **जैविक** व **मज्जाशास्त्रीय** दृष्टिकोनावर व शेवटी **वैकसिक** दृष्टिकोनावर भर देते. यांचा थोडक्यात आढावा घेऊ.

- **बोधनिक दृष्टीकोण (Cognitive Approach)**

**सामाजिक वातावरण, परस्पर संबंध, मानवी स्वभाव आणि स्वतःविषयी व्यक्तीने बाळगलेल्या अभिवृत्ती, समजुती, मूल्ये आणि विचार म्हणजे बोधन होय** (Cognition refer to attitude beliefs values and thoughts that people hold about the social environment, interrelation, human nature and themselves.)

अट्टल (गंभीर) गुन्हेगारांच्या बोधनामध्ये बऱ्याचदा विरुपण झालेले असते. एखाद्या संकल्पनेस त्यांच्या मूळ वास्तवतेपेक्षा वेगळया (चुकीच्या) अर्थाने पाहणे म्हणजे विरूपण होय. मुलांनी नेहमी शिस्तबद्ध असावे. हे बोधनिकचे उत्तम उदाहरण आहे. पूर्वग्रह हा देखील बोधनिकतेचा एक भाग आहे. ज्यामध्ये सामाजिक वास्तवतेच्या विरूपणाचा समावेश होतो. तसेच दोषयुक्त सामान्यीकरण व इतरांचा चुकीचा अर्थ लावण्याचा यामध्ये समावेश होतो. पूर्वग्रहावर आधारित गुन्ह्याची मुळे सामान्यतः गुन्हेगारांच्या पूर्वग्रहांमध्ये असतात. बऱ्याच साखळी किंवा मालिका बलात्काऱ्यामध्ये सामाजिक वास्तवतेचे विरूपण झालेले असते. त्यामुळे त्यांना जे दोषी वाटतात त्यांचाच ते बळी घेतात. काही गुन्हेगारांचा तर असा पूर्वग्रह असतो की ते त्यांच्या बळींना इजा पोहोचवत नाहीत (मुक्ती देत आहेत). आणि पांढरपेशिय गुन्हेगारांना तर गुन्हा म्हणजे एक व्यापार वाटतो. त्यामुळे गुन्हेगारांची बोधनिकता समजून घेणे खूप महत्त्वाचे असते.

- **वैकासिक दृष्टिकोन (Developmental Approach)**

गुन्हेगारी वर्तनाची सुरुवात आणि त्यामध्ये वाढ कशी होते? हे समजून घेणे खूप महत्त्वाचे असते. यासाठी जीवनभरात होणारे बदल आणि त्याचा समाजविरोधी वर्तनावर कसा प्रभाव पडतो याचे परीक्षण वैकासिक दृष्टिकोन करतो. थोडक्यात **जोखीम घटक (Risk Factors)** उदाहरणार्थ निकृष्ट पोषण, पालक गमावणे, शालेय अपयश, निकृष्ट कुटुंब इत्यादी. त्याचबरोबर संरक्षक भूमिका बजावणारे **संरक्षक घटक (Protective factors)** उदाहरणार्थ उत्तम सामाजिक कौशल्ये संपादित करणे, इत्यादी शोधण्यावर वैकासिक दृष्टीकोन भर देतो. जेणेकरून अपराधी व गुन्हेगारी वर्तनास प्रतिबंधीत करणे सोपे जाते.

- **गुणविशेष दृष्टीकोण (Trait Approach)**

**एका विशिष्ट मार्गाने वागण्याची आणि व्यक्तीमध्ये भेद करणारी व्यक्तीमधील स्थिर आणि टिकाऊ प्रवृत्ती म्हणजे गुणविशेष होय** (A trait or disposition is a relatively stable and enduring tendency to behave in a particular way it distinguishes one person from another)

वर्तनावर प्रभाव टाकणाऱ्या गुणविशेषांचा अभ्यास करून मानवी वर्तन समजून घेता येते. असे मानसशास्त्रज्ञांना वाटते. उदा. अंतर्मुखता, बहिर्मुखता इत्यादी. हल्लीच्या काही वर्षांमध्ये संशोधकांनी (e.g. Fric and White, 2008) निष्ठुर भावनाविरहित गुणविशेषांवर (Callous-unemotional traits) भर दिला आहे. असे गुणविशेष बऱ्याचदा व्यक्तीमधील मनोविक्षिप्ततेशी आणि गुन्हेगारीशी संबंधित असू शकतात/नसतात. निष्ठुर भावनाविरहित गुणविशेषांमध्ये परानुभूतीचा अभाव असतो. असे गुणविशेष बऱ्याचदा आक्रमक, समाजविरोधी वर्तनासाठी कारणीभूत ठरतात. स्व-नियंत्रण हा एक गुणविशेष अभ्यासामध्ये लक्षवेधी ठरला आहे.

गुणविशेष सिद्धांतकर्त्यांच्यामते, गुणविशेष, वेळ ठिकाणानुसार स्थिर असतात. याच स्थिर वर्तनास व्यक्तिमत्व म्हटले जाते. त्यामुळे गुन्हेगाराच्या व्यक्तिमत्व गुणविशेषांचा शोध घेतला पाहिजे. एकदा का गुन्हेगारी वर्तनातील व्यक्तिमत्व गुणविशेषाचा शोध लागला की, व्यक्ती गुन्हेगारी वर्तनात का गुंतली? याचे निर्धारण व पूर्वकथन करणे सोपे जाते. त्यामुळे गुन्हेगारी मानसशास्त्रज्ञ वातावरण आणि परिस्थितीवर कमी भर देतात .

तथापि एखाद्या गुन्हेगाराच्या व्यक्तिमत्व गुणविशेषांचा शोध घेणे थोडे कठीणच काम असते. पण हल्लीच्या दृष्टीकोनांमध्ये गुन्हेगारांच्या व्यक्तिमत्व गुणविशेषा बरोबरच त्यांच्या बोधनिक, मज्जामानसशास्त्रीय आणि वैकासिक घटकांचेही स्पष्टीकरण केले जाते. त्यामुळे या कार्यातील कठिणता कमी होते.

❖ **जोखीम घटक म्हणजे काय? (What is risk factors)**

**तरुणांची गुन्हेगारी आणि इतर समस्याजन्य वर्तनामध्ये गुंतण्याच्या संभाव्यतेशी जोडले असलेले व्यक्तिगत गुणविशेष, वातावरणातील गुणवैशिष्ट्ये किंवा कुटुंब, शाळा, सामुदायिक परिस्थिती म्हणजे जोखीम घटक होय** (Risk factor are personal traits, characteristic of the environmental are conditions in the family, School or community that are link to youths livelihood engage in delinquency and other problem behavior - Murry and Farringtor, 2010).

**अशी कोणतीही गोष्ट ज्यामुळे व्यक्तीची हानी होण्याची संभाव्यता वाढते** (Anything that increases the probability that a person will suffer harm – Office of the Surgeon General, 2001).

**विशेषत: गुन्हेगारी वर्तनाबाबत विचार केल्यास असा कोणताही घटक ज्यामुळे गुन्हेगारी वर्तनामध्ये वाढ होण्याची संभाव्यता वाढते.** त्यांना गुन्हेगारी वर्तनासाठी कारणीभूत जोखीम घटक म्हणता येईल. उदाहरणार्थ गरीबी, भावंडांनी/जोडीदारांनी नाकारणे, पूर्व शालेय व शालेय पश्चात लाभणारे वातावरण, शैक्षणिक अपयश इत्यादी तर संरक्षण घटकांचा विचार केल्यास,

**जोखीम घटकांचे संभाव्य हानिकारक परिणाम कमी करणारा कोणताही घटक म्हणजे संरक्षक घटक होय** (A protective factor is something that decrease the potential harmful effect of risk factor- office of the surgeon general, 2001)

तर, गुन्हेगारी वर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या सामाजिक, कौटुंबिक आणि मानसशास्त्रीय घटकांचा आढावा घेऊ.

## 1.1 सामाजिक वातावरण जोखीम घटक (Social environment risk factors)

### अ) समवयस्कांचे नाकारणे आणि समाजविरोधी समवयस्कांशी संबंध असणे (Peer rejection and association with antisocial peers)

समवयस्कांमधील संबंधाचा त्यांच्या भावनीक व सामाजिक विकासावर परिणाम होत असल्याचे वैकासिक संशोधकांना सातत्याने निदर्शनास आले आहे. मुलं जसं-जशी किशोरावस्थेत येतात, तस-तसा पालकांचा प्रभाव कमी होऊन समवयस्कांचा एकमेकांवरील प्रभाव वाढत जातो. मादक द्रव्यांचे सेवन, गुन्हेगारी वर्तन, इत्यादी चे भाकीत सुद्धा समवयस्कांच्या प्रभावातूनच होते. बऱ्याच पालकांना हा प्रभाव सहाजिक वाटतो. पण समवयस्कांचे एकमेकांना नाकारणे व समाजविरोधी वर्तन ही सहाजिक घडून येणारी गोष्ट नसून याकडे सूक्ष्मपणे पाहणे आवश्यक आहे.

विकासाच्या सुरुवातीच्या काळात समवयस्कांनी नाकारणे मुलांमधील, भविष्यातील समाजविरोधी वर्तनाचे भाकीत करते. शालेय जीवनामध्ये समवयस्कांनी नाकारणे किंवा स्वीकारणे, मुलांच्या निरोगी (आरोग्यदायी) मानसिक, भावनिक विकासामध्ये अत्यंत निर्णायक ठरते. शालेय जीवनामध्ये समवयस्कांकडून नाकारले जाण्याचा प्रभाव किशोराअवस्थेतील गुन्हेगारी वर्तन आणि संपूर्ण जीवनभर समाजविरोधी वर्तनाच्या स्वरूपात दिसतो. संशोधनातून हे स्पष्ट झाले आहे की, प्रथम शालेय वर्षात समवयस्कांनी नाकारल्याचा परिणाम शाळेच्या चौथ्या वर्षात समाजविरोधी वर्तनाच्या स्वरूपात दिसतो (Cown & Cown, 2004; Miller- Johnson et. at., 2002). याचबरोबर ज्या मुलांना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी समवयस्कांकडून नाकारले जाते, त्यांच्यामध्ये किशोरअवस्थेत समाजविरोधी वर्तनाची चिकित्सालयीन दृष्ट्या निदान होईल इतपत 50% संभाव्यता दिसून येते. विरुद्धार्थी जी मुले सुरुवातीच्या अवस्थेतील नाकारलेपणास दुर्लक्षित करू शकतात, त्यांच्यामध्ये हे प्रमाण फक्त 9% दिसते (Dodge & Petti, 2003). काही मुलांमधील आचरण विकृतीमुळे समवयस्कांद्वारे त्यांना नाकारले जाते. ज्यामुळे प्राथमिक शालेय वयामध्ये अशा मुलांमध्ये अवसाद (उदासीनतेची) विकृतीची लक्षणे निर्माण होतात.

**पालकांची वैवाहिक गुणवत्ता आणि बालक-पालक संबंध** याचा प्रभाव समवयस्कांद्वारे नाकारले जाण्यावर होतो. क्राउन & क्राउन (Cown & Cown, 2004) यांच्यामते पालकांचे नकारात्मक वैवाहिक जीवन व नकारात्मक बालक पालक संबंधामुळे बालवाडी पूर्व व बालवाडी वयात मुलांमध्ये निम्न सामाजिक कौशल्य व आक्रमक वर्तन विकसित होते. ज्यामुळे अशा मुलांना प्राथमिक शालेय जीवनात समवयस्कांद्वारे नाकारले जाते.

ज्या मुलांना समवयस्कांद्वारे नाकारले जाते अशी मुले इतर समाजविरोधी वर्तन करणाऱ्या मुलांकडे खेचली (आकर्षिली) जातात. त्यामुळे किशोरावस्थेतील समाजविरोधी संगतीचा संबंध पुढे जाऊन मादक द्रव्यांचे सेवन, गुन्हेगारी वर्तन व इतर समस्याजन्य वर्तनाशी दिसतो (Laird et. at., 2005). त्यामुळे सामाजिक जडणघडणीच्या काळात मुलांमध्ये समाजविरोधी आणि गुन्हेगारी वर्तन दिसून येणे याला समवयस्कांनी नाकारणे आणि समाजविरोधी वर्तन असणाऱ्या सोबत्यांची संगत कारणीभूत असते असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**1) काही बालकांना त्याच्या समवयस्कांद्वारे का नाकारले जाते? (Why are some children rejected by their peers?)**

अनेक कारणामुळे समवयस्कांद्वारे मुलांना नाकारले जाते. बऱ्याचदा ही मुले **इतरांपेक्षा वेगळी** असतात हे कारण पुढे येते. उदाहरणार्थ **स्वमग्नता विकृती (autism)** असणाऱ्या बालकांमधील अप्रभावी सामाजिक कौशल्यामुळे त्यांना नाकारले जाते. अशी मुलं प्रतिभावंत तेजस्वी व हुशार असतात. पण बऱ्याच प्रसंगी अप्रभावी ठरल्यामुळे किवा प्रभावी नेत्रसंपर्क करू न शकल्याने असा नकार दिला जातो. अशी मुलं वार्तनिक दृष्ट्या आक्रमक नसतात. पण परिणामांचा विचार न करता हवे ते बोलतात. ज्यामुळे अशी मुलं मैत्री अबाधित ठेवण्यात अपयशी ठरतात. **काही मुलांचा पोशाख व्यवस्थित नसणे किंवा कुटुंबातील एखादी व्यक्ती शिक्षा भोगत असणे** इत्यादी कारणामुळे ही मुलांना नाकारले जाते. बऱ्याच **मुलांचे आक्रमक वर्तन** नकारास कारणीभूत ठरते (Lanasford et. at. , 2010). ज्या मुलांच्या वर्तनातून शारीरिक व शाब्दिक आक्रमक्ता दिसते अशा मुलांना नाकारण्याचा कल  इतर मुलांचा दिसतो. पण आक्रमकता आणि समवयस्कांनी नाकारणे यामध्ये थेट संबंध दिसून येत नाही. कारण जी मुलं लाजाळू, सामाजिक दुरावा राखणारी, इतरांपेक्षा वेगळी असतात अशा मुलांनाही नाकारले जाते. आणि दुसऱ्या बाजूस सर्वच आक्रमक मुलांना नाकारले जाते असेही नाही. कारण बरीचशी प्रसिद्ध तरुण मुले वर्चस्व गाजवणारी, उद्धट आणि वार्तनिक व नातेसंबधात्मक दृष्ट्या आक्रमक दिसतात (Gillessen & Mayeux, 2004; Rose, Swenson & waller, 2004). त्यामुळे मुले आक्रमक आहेत  म्हणून त्यांना नाकारले जाते असा तर्क काढणे तितकेसे योग्य ठरणार नाही. यासंदर्भात 2019 साली प्रदर्शित झालेल्या कबीर सिंग या हिंदी चित्रपटाचे उदाहरण घेता येईल ज्याला अनेक तरुणांनी पसंती दर्शविली होती.

दुसऱ्या बाजूस जी मुले शारीरिक दृष्ट्या आक्रमक असतात आणि सामाजिकदृष्ट्या समवयस्कांकडून नाकारली जातात अशा मुलांची, किशोरावस्थेत गुन्हेगारी वर्तनात आणि प्रौढवस्थेच्या सुरुवातीस हिंसक गुन्ह्यामध्ये गुंतण्याची संभाव्यत: अधिक असते.

पण असे असूनही हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो की इतर मुलांच्या तुलनेत आक्रमक प्रवृत्तीच्या मुलांना प्रथम दर्शनीच का नाकारले जाते? कोई (Coie,2004) यांच्यामते याची तीन महत्त्वाची कारणे आहेत.

**i. अशी मुले अतिशय आवेगशील असतात आणि एखाद्या कार्यावर सातत्यपूर्ण लक्ष केन्द्रित करू शकत नाहीत.** त्यामुळे शाळेमध्ये, सामूहिक खेळांमध्ये अशा मुलांद्वारे व्यत्यय निर्माण होतो.

**ii. अशा मुलांना पटकन राग येतो व त्यावर त्यांना त्वरित नियंत्रण मिळवता येत नाही.** ज्यामुळे अशा मुलांमध्ये शाब्दिक व वार्तनिक आक्रमकता दिसते. परिणामतः अशा मुलांना टाळण्याचा कल इतर मुलांचा दिसतो.

**iii. अशा मुलांमध्ये मित्र बनविण्याची व सकारात्मक नातेसंबंध जोपासण्याची आंतरवैयक्तिक सामाजिक कौशल्यांची कमतरता दिसते.** सामान्य परिस्थितीमध्ये या कौशल्यांचा वापर करण्याची संधी उपलब्ध न झाल्याने या कौशल्यांचा अभाव अशा मुलांमध्ये दिसतो.

थोडक्यात अशी मुले नेहमीच धोकादायक असतात असे नाही, पण वादविवाद करणारी, लक्ष न देणारी, कामात व्यत्यय आणणारी व निकृष्ट सामाजिक कौशल्ये असणारी असतात.

ज्या मुलांच्या वर्तनात अनावधानशिलता, आवेगशिलता आणि वार्तनिक व्यत्यय असतो अशा मुलांमध्ये **अवधान दोष अतिक्रियाशीलता विकृती (ADHD)** असण्याची संभाव्यता नाकारता येत नाही. यामुळे देखील अशा मुलांना समवयस्कद्वारे नाकारले जाते. या संदर्भात इरहर्ड आणि हीनशौ (1994) यांनी एक अभ्यास केला. यामध्ये 6-12 वयोगटातील 25 ADHD ग्रस्त व 24 इतर सामान्य मुलांचा समावेश होता. यामध्ये दोन वेगवेगळे गट करण्यात आले यांची कल्पना दोन्ही गटातील मुलांना नव्हती. सामाजिक आंतरक्रियेच्या पहिल्या दिवशी या दोन्ही समूहातील मुलांच्या वर्तनात तफावत दिसून आली. ADHD ग्रस्त मुलांचे वर्तन अधिक व्यत्ययजनक होते व इतर समवयस्कांनी त्यांना नाकारल्याचेही दिसले. याचबरोबर इतर अभ्यासांमधूनही ADHD ची लक्षणे आणि आक्रमक वर्तनाचा प्रासंगिक समाजविरोधी वर्तनाशी संबंध दिसून आला आहे (Coie, 2004).

**2) समवयस्कांनी नाकारणे व लिंगभेद (Gender difference in peer rejection)**

समवयस्कांचे नाकारणे, समवयस्कांमधील आक्रमकता आणि गुन्हेगारी वर्तन यासंदर्भात झालेली अनेक संशोधने मुलींपेक्षा मुलांवर केंद्रित झाल्याची दिसतात. कारण, आक्रमक वर्तन आणि समवयस्कांचे नाकारने याचा खूप कमी सबंध मुलींबाबत दिसून येतो. जसे प्रिस्टीन आणि ला ग्रीसा (2004) यांना असे आढळून आले की मुली आणि मुलांमधील समाजविरोधी आणि गुन्हेगारी वर्तनाचे भाकीत मुलांचे सुरुवातीच्या वयातील समवयस्कांशी असणाऱ्या आक्रमक संबंधाद्वारे होते. तर, हिगीन्स पिक्यूरो आणि पिक्यूरो (2011) यांनी केलेल्या 413 बालकांच्या व किशोरांच्या अभ्यासामध्ये मुलांमध्ये उच्च प्रतिचा समवयस्कांचा नकार दिसून आला तर मुलींमध्ये दिसून आला नाही.

**नातेसंबंधात्मक आक्रमकता** (Relational aggressiveness) हे सुद्धा मुलांना नाकारण्याचे एक कारण दिसते. अशा मुलांना इतर मुलांद्वारे नाकारले जाते (Crick, 1995).

**शब्दांद्वारे किंवा टाळाटाळ करून अथवा इतर अशारीरिक पद्धतींचा वापर करून इतरांना दुखावण्याची किंवा त्यांचा सामाजिक दर्जा कमी करण्याची व्यक्तीमधील प्रवृत्ती म्हणजे नातेसंबंधात्मक आक्रमकता होय** (Relational aggression is the tendency to hurt others and diminish their social status by words shunning, or other non-physical methods)

किशोरावस्थेतील मुलींमधील मादक द्रव्यांचे सेवन आणि इतर गुन्हेगारी वर्तनामुळे इतर समवयस्क मुलींद्वारे अशा मुलींना नाकारले जाते (प्रिस्टिंग आणि ला ग्रेसा). तर दुसऱ्या बाजूस समवयस्कांचा स्वीकार यामधून आक्रमक गुन्हेगारी वर्तनाची जोखीम कमी झाल्याचे आणि किंबहुना नाहीशी होतानाचेही दिसते त्यामुळे उच्चप्रतीच्या स्विकारामुळे बाल्यावस्थेतील आक्रमकता आणि गुन्हेगारी वर्तनात परिवर्तन होत असल्याचे स्पष्ट होते.

**3) नाकारलेल्या तरुणांवर टोळी / विचलित समूहाचा होणारा परिणाम (Gang or deviant group influences on rejected youth)**

समवयस्कांचा प्रभाव आणि त्यातून निर्माण होणारे समाजविरोधी व गुन्हेगारी वर्तन याचे स्पष्टीकरण करणारे तीन दृष्टिकोण आहेत. **पहिल्या दृष्टिकोनानुसार,** सामाजिकदृष्ट्या विचलित समूहाच्या संपर्कात आल्याने मुले गुन्हेगार बनतात. **दुसऱ्या दृष्टिकोनानुसार,** समवयस्कांनी नाकारलेली आणि समाजविरोधी वर्तनामध्ये गुंतलेली मुले तशाच प्रकारच्या तरुणांच्या संपर्कात आल्याने गुन्हेगारी वर्तनाकडे वळतात . तर **तिसरा दृष्टीकोण** या दोन्हींचा एकत्रित सार दिसतो. या दृष्टिकोनानुसार सामाजिक दृष्ट्या व समवयस्कांद्वारे नाकारलेली मुले तशाच प्रकारच्या तरुणांच्या संपर्कात येऊन नंतर तशाच प्रकारच्या टोळीच्या संपर्कात येतात. ज्यामुळे त्यांच्यातील समाजविरोधी प्रवृत्तीस अधिक चालना मिळते. सध्यास्थितीतील संशोधने तिसऱ्या दृष्टिकोनास अधिक चालना देतात.

यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे समवयस्कांद्वारे मुलांना नाकारण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे इतरांसोबत मिळून मिसळून राहण्यासाठी अशा मुलांना सामाजिक व आंतरवैयक्तिक कौशल्ये शिकण्याची संधी उपलब्ध न होणे. आणि त्यात ज्यादाची भर म्हणजे अशा नाकारलेल्या मुलांचा पुढे जाऊन या प्रकारची कौशल्ये शिकण्याकडे कल कमी दिसतो. त्यामुळे अशी मुले सामाजिक परिस्थितीचा व्यवस्थित अर्थ लावण्यात अपयशी ठरतात परिणामतः अशा मुलांच्या वर्तनामध्ये विचित्रपणा दिसून येतो. सामाजिक माहितीचे योग्य प्रकारे प्रक्रियन करता आल्यास अशी मुले इतरांच्या वर्तनाचा योग्य अर्थ लावू शकता. त्यामुळे समवयस्कांद्वारे नाकारल्या जाणाऱ्या मुलांना सामाजिक व त्याचबरोबर आंतरवैयक्तिक कौशल्ये शिकण्याची संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे.

## 2.2 पालकत्व आणि कौटुंबिक जोखीम घटक (Parental and family risk factors)

मुलांच्या समाजविरोधी वर्तनामध्ये कुटुंब विशेषत: एकत्रित कुटुंब एक निर्णायक घटक ठरतो. यासंदर्भातील सामाजिक शास्त्रीय संशोधने कुटुंबाच्या संरचनेपेक्षा (उदा. एक पालक कुटुंब) कुटुंबाच्या प्रक्रियेवर (उदा. पालकत्वाची गुणवत्ता) अधिक सूक्ष्म परीक्षण करतात. मुलांना निरोगी/आरोग्यदायी वातावरण पुरविण्याचे काम कुटुंब करते. कुटुंबातील प्रक्षोभक प्रसंग जसे कुटुंबामध्ये बालकांचा होणारा दुरुपयोग, सततची टिका आणि अपमान आणि पालक आणि कुटुंबातील इतर सदस्य आणि मुले यांच्यातील दंडात्मक/सक्तीची आंतरक्रिया इत्यादी घटकावर अधिक भर दिला जातो. एकदा कुटुंबातील जोखीम घटक समजले की संगोपनात्मक कुटुंब निर्माण करण्यासाठी उपचार व मध्यस्थीचा उपाययोजना करता येते.

### अ) पालकत्व शैली आणि कौशल्ये/पालन पोषण पद्धती (Parental styles and practices)

**पालक किंवा काळजीवाहक त्यांच्या मुलांशी कोणत्या प्रकारे आंतरक्रिया करतात याच्याशी पालकत्व शैली आणि पालकत्व कौशल्य/पालन पोषण पद्धती संबंधित आहेत.** पालकत्वाची शैली आणि पालकांची कौशल्ये मुलांच्या गुन्हेगारी वर्तनास कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे या दोन्ही संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे.

**विशिष्ट संदर्भ आणि परिस्थितीच्या पलीकडे जाऊन मुलांनी विशिष्ट शैक्षणिक, सामाजिक आणि क्रीडा विषयक ध्येय साध्य करावी यासाठी पालकांद्वारे वापरल्या जाणाऱ्या युक्त्या म्हणजे पालकत्व कौशल्य/पालन पोषण पद्धती होय** (Parental practices are strategies employed by parents to achieve specific academic, social or athletic goals across different contexts and situation – *Hart , Nelson Robinson , Olsen and MeNeilly- Choque, 1998).*

मुलांच्या एखाद्या विशिष्ट पैलूवर प्रकाश टाकण्याचा भर पालकत्व कौशल्यांचा दिसतो (Mounts, 2002). उदाहरणार्थ मुलांना पैशाचे व्यवस्थापन करता यावे म्हणून साप्ताहिक खर्चासाठी मोजके पैसे देणे. मुलांच्या बौद्धिक व भाषिक विकास व्हावा म्हणून मुलांबरोबर मोठ्याने वाचन करणे, मुलांच्या क्रीडा स्पर्धेस उपस्थित राहणे, शाळेमध्ये सोबती म्हणून जाणे इत्यादी. मुलांच्या विशिष्ट वर्तनावर, अगदी बसण्यापासून शाळेतील प्रगती पर्यंत आणि गुणवैशिष्ट्यांवर (जसे, विशिष्ट मुल्ये किंवा उच्च स्व-आदर संपादित करणे) पालकत्व कौशल्यांचा थेट परिणाम होतो. त्यामुळे मुलांच्या विकासामध्ये पालकांची कौशल्य अधिक निर्णायक ठरतात.

**पालकांची त्यांच्या मुलांच्याप्रतिची अभिवृत्ती आणि पालक-बालक नातेसंबंधातील भावनिक वातावरण युक्त पालक-बालक आंतरक्रिया म्हणजे पालकत्व शैली होय** (Parental style refer to parent child interaction characterized by parental attitude towards the child and emotional climate of the parent- child relationship. – Baumrind, 1991; Mounts, 2002.).

चेहऱ्यावरील हावभाव, आवाजाचा टोन, भावनांची उत्स्फूर्त अभिव्यक्ती ही काही पालकत्व शैलीची उदाहरणे आहेत. जबाबदार पालक-बालक आंतरक्रियेचे ऊबदार, खेळीमेळीचे, स्वीकारक आणि एकमेकांना वेळ देणारे असे वर्णन करता येईल. जबाबदार पालकत्वातून मुलांमध्ये सामाजिक सक्षमता, समवयस्काचा स्वीकार करण्याची वृत्ती आणि निम्न समाजविरोधी वर्तन विकसित होते (Hart et. al.,1998) तसेच जबाबदार पालकत्वातून मुलांच्या शारीरिक, आंतरवैयक्तिक आणि जवळीकतेच्या मूलभूत गरजांची पूर्तता होते, त्यातून मुलांची भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक वाढ होते.

**1) पालकत्व शैलीचे प्रकार (Types of parental style)**

डायना बुमरिंड (1991) यांनी पालकत्व शैलीचे चार प्रकार सांगितले आहेत.

**i) अधिकारशाही/ हुकूमशाही पालकत्व शैली (Authoritarian parenting style)**

**या शैलीचे पालक त्यांच्या मुलांना पूर्वप्रस्थापित, परिपूर्ण मानदंडानुसार आकार, नियंत्रण आणि मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करतात.** अशा कुटुंबाचे स्वतःचे कायदे- कानून असतात ज्यांचे कोणतेही प्रश्न किंवा स्पष्टीकरण न विचारता मुलांनी पालन करणे बंधनकारक असते. पालक आणि मुले यांच्यातील समानतेचे मैत्रीपूर्ण संबंधास वाव मिळेल अशा प्रकारच्या कोणत्याही शाब्दिक आंतरक्रियेस पालक प्रोत्साहन देत नाहीत आणि कुटुंबातील निर्णय घेण्याचे सर्वस्वी हक्क पालकांकडे असतात. आपल्या मुलांनी आज्ञाधारक आदरपूर्ण असावे व मुलांनी कोणतेही प्रश्न विचारू नयेत अशी या शैलीच्या पालकांची अपेक्षा असते. अशा कुटुंबातील मुलांचे विचलित (चुकीचे) वर्तन आणि मर्यादांचे उल्लंघन शिक्षेस पात्र असते. ज्यामध्ये शारीरिक शिक्षा प्राधान्याने दिली जाते.

एका मुलाने शाळेमध्ये त्याचा कौटुंबिक किस्सा सांगितला. एके रात्री आमचा मोठा भाऊ मद्यधुंद अवस्थेत घरी आला असता, आमच्या वडिलांनी आम्हा सर्वांना झोपेतून उठवले व आमच्या समोर त्याला चाबकाने फटके दिले, आणि सांगितले की तुम्ही जर असे कराल तर तुम्हालाही हेच भोगावे लागेल. याविषयी मुलाला काय वाटले? हे विचारले असता आमचे वडील आमच्यावर खूप प्रेम करतात. त्यामुळे यातून आम्हाला धडा शिकायला मिळाला असे त्याने मत व्यक्त केले. आपल्यापैकी काहीजण याच्याशी सहमत किंवा असहमत असाल तर काहीजण याला बालहिंसा म्हणाला. पण काही असो शारीरिक शिक्षेचे मुलांच्या शारीरिकतेवर व मानसिकतेवर नकारात्मक परिणाम होतात. त्यामुळे मुलांच्या निरोगी विकासात बाधा येऊ शकते. **मात्र अधिकारशाही पालकत्व आणि गुन्हेगारी वर्तन याचा जवळचा संबंध असल्याचे अद्यापही स्पष्ट झालेले नाही.**

**ii) उदारमतवादी पालक शैली/मोकळीक देणारे पालक (Permissive parenting style)**

**या शैलीचे पालक त्यांच्या मुलांच्या वर्तनाप्रति सहनशीलता, दंडात्मक व स्वीकारक अभिवृत्तीचे असतात.** अशा प्रकारचे पालक, हुकुमशाहीपणा टाळणारे आणि मुलांना सामाजिक स्वातंत्र्य देणारे असतात. मुलांच्या गरजांसाठी आपण स्तोत्र आहोत असे ते मानतात. आणि आवश्यकता असल्यास मुलांशी सल्ला - मसलतही करतात. अशा पालकांच्या मुलांना जेवण्याची, खेळण्याची, घरी येण्याची वेळ निवडण्याचे स्वातंत्र्य असते. आणि अशा पालकांचे मुलांवर कमी समन्वय (नियंत्रण) असते. **मुलांनी आपल्या चुकातून स्वतःशिकावे असा दृष्टिकोन या शैलीचा पालकांचा असतो.** या शैलीची शिफारस केली नसल्याचे संशोधनातून दिसते.

**iii) विश्वासाहर्य / दिशादर्शक पालकत्व शैली (Authoritative Parenting Style)**

**असे पालक मुलांच्या वर्तनास मुद्यास अनुसरून, तार्किकपणे दिशा देण्याचा प्रयत्न करतात.** या शैलीचे पालक आणि त्यांच्या मुलांमध्ये एखाद्या निर्णयाबाबत दुहेरी मुक्तसंवाद होतो. सामाजिक नियंत्रणानुसार योग्य चर्चा करून कुटुंबाचे स्वास्थ्य राखण्याचा प्रयत्न असे पालक करतात. वयानुसार मुलांमध्ये परिपक्वता यावी अशी त्यांची अपेक्षा असते. आणि कौटुंबिक नियम, मानदंडाचे पालन मुलांनी करणे अपेक्षित असते. पण याचबरोबर मुलांमधील स्वातंत्र्य आणि स्वावलंबनास ही वाव असे पालक देतात. काही चुकांबाबत अशा पालकांकडून मुलांना स्वातंत्र्य मिळते. पण त्याचे सबळ कारण किंवा स्पष्टीकरण देणे अपेक्षित असते. आवश्यकता असल्यास शिक्षेचा ही अवलंब असे पालक करतात.


**iv) दुर्लक्षित पालकत्व शैली (Neglecting Parenting Style)**

**या शैलीचे पालक त्यांच्या मुलांचे जीवन आणि हालचालीपासून दूर राहतात व खूप कमी ढवळाढवळ करतात.** असे पालक मुलांकडून खूप अपेक्षाही करत नाहीत आणि मुलांसाठी तितकेसे प्रतिसादात्मकही नसतात. मुलांचा समन्वय आणि त्यांच्यासाठी आधार म्हणून उभे राहण्याचा अभाव अशा पालकांमध्ये असतो. पालकत्वाच्या जबाबदारीचा अभाव (दुर्लक्षिता) यांच्यामध्ये असतो (Bcumrind, 1991). सामान्यतः पालक त्यांच्या मुलांच्या किमान गरजांकडे/ वर्तनाकडे लक्ष देतात. पण, या शैलीच्या पालकांना त्यांच्या मुलांचे वर्तन, हालचालींवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यात खूप कमी रुची असते. होईवी व त्यांच्या सहकाऱ्यांनी (2007) मध्ये केलेल्या अभ्यासामध्ये या पालकत्व शैलीचा

मुलांच्या गुन्हेगारी वर्तनाशी व जीवनाशी संबंध दिसून आला आहे. अशा कुटुंबातील मुलांमध्ये समाज विरोधी वर्तन आणि स्व:नियमन, सामाजिक जबाबदारी आणि बोधनिक सक्षमतेचा अभाव असल्याचे बुमरिंड यांना दिसून आले.

पण, बुमरिंड यानी सांगितलेल्या पालकत्व शैलींबाबत काही समस्याही दिसतात. जसे, काही पालक उदारमतवादी आणि दिशादर्शकही असतात. असे पालक मुलांना त्यांच्या दैनंदिन गोष्टीबाबत निर्णय घेण्याची परवानगी देतात. पण शाळा, करियर, काम (नोकरी) इत्यादी बाबत ठोस अपेक्षाही ठेवतात. पण काही पालक उदारमतवादी आणि हुकूमशाही शैलीचे सुद्धा असतात. त्यामुळे बुमरिंड यानी सांगितलेल्या पालकत्व शैलींपैकी कोणतीही एकमेव शैली पालकांमध्ये दिसेल असे म्हणजे समर्पक ठरणार नाही. मात्र असे असले तरी, पालकांची शैली आणि मुलांचे यश याचे चित्र सुस्पष्ट करण्यात या शैली यशस्वी ठरतात असे म्हणायला हरकत नाही. बुमरिंड यांनी सांगितलेल्या चार पालकत्व शैलींचा पुढील आकृतीच्या आधारे संक्षिप्त आढावा घेता येईल.

**आकृती 2.1**




**2) मत्सर आणि हलक्या/निम्न दर्जाची पालकत्व शैली (Enmeshed and lax parental style)**

जेम्स स्नायडर ( James Snyder) आणि गिराल्ड पॅटीरसन (Gerald Patterson, 1987) यांनी सुद्धा दोन पालकत्व शैलींचे चे वर्णन केले आहे. ज्यांचा त्यांच्यामते गुन्हेगारीमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या योगदान आहे.

**i) मत्सर पालकत्व शैली (Enmeshed parental style)**

ही शैली बुमरिंडच्या अधिकारशाही पालकत्व शैलीशी अधिक जुळते. या शैलीचे पालक मुलांच्या क्षुल्लक चुकांनाही समस्याजन्य वर्तनाच्या स्वरूपात पाहतात आणि त्यांना हाताळण्यासाठी अप्रभावी अधिकारवादी युक्त्यांचा वापर करतात. **जसे शाब्दिक द्वेष, नापसंती इत्यादी पण** यामध्ये शारीरिक हिंसेचा समावेश व सातत्यता नसते. मात्र या शैलीमुळे कुटूंबातील सदस्यांमध्ये एकमेकांविरोधी भूमिका विकसित होतात. यामध्ये कुटुंबातील एका सदस्याने आक्रमक भूमिका घेतल्यास दुसरा त्याचप्रकारे त्याला प्रातिउत्तर देतो. परिणामत: कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये एकमेकांना चिथावणारे वातावरण निर्माण होते. उदाहरणार्थ मोठा भाऊ छोट्या भावंडावर एखादी वस्तू का घेतली ? म्हणून रागावतो प्रत्युत्तर म्हणून छोटा भाऊ मोठ्या भावंडावर किंचाळतो. ज्यामुळे मोठा भाऊ त्याच्या अंगावर धावून जातो. हे पाहून वडील त्यांच्यावर जोरजोराने ओरडतात. त्यामुळे मोठा मुलगा दरवाजा जोरात आदळुन निघून जातो. आणि हे पाहून वडील दरवाजावर जोराने हात मारतात व पत्नीवर (आईवर) ओरडतात. त्यामुळे आई सुद्धा झिडकारून निघून जाते.

या शैलीचे पालक अधिकारशाही शैलीचा, विशेषत: त्यामध्ये शिक्षेचा वापर करतात. पण यामध्ये सातत्यता नसल्याने व अप्रभावीपणा असल्याने पालक मुलांच्या प्रत्येक चुकीच्या वर्तनास शिक्षा देण्यास अक्षम ठरतात. त्यामुळे मुलांमधील समाजविरोधी वर्तनावर नियंत्रण ठेवण्यात ही शैली अपयशी ठरते.

**ii) हलक्या/निम्न दर्जाची पालकत्व शैली (Lax parental style)**

या शैलीचे पालक मत्सर शैलीच्या अगदी विरोधी युक्त्यांचा अवलंब करतात. स्नायडर आणि पॅटीरसन यांच्यामते, प्रस्तुत शैलीच्या पालकांना मुलांच्या वर्तनातील नेमके समस्याजनक काय आहे? आणि समाजविरोधी काय आहे? याचा ताळमेळ घालता येत नाही. ज्यामुळे मुलांना बेशिस्तपणे बरेचकाही करण्याची मुभा मिळते. याचबरोबर विविध कारणांमुळे असे पालक आपली मुले विचलीत, समाजविरोधी वर्तनामध्ये गुंतलेली आहेत हे ओळखण्यात व स्विकारण्यात अपयशी ठरतात. त्यामुळे आपल्या मुलांकडून असे काही घडले किंवा घडत आहे आणि त्यासाठी आपण त्यांना समजावले पाहिजे यावर त्यांचा विश्वास बसत नाही. आपल्या मुलांकडून असे काही घडते याची आपणास कल्पनाच नाही याचा आव असे पालक आणतात.

पालकांचे मुलांवरील अतिनियंत्रण (अधिकारशाही शैली) मुलांमध्ये आक्रमकता व समाजविरोधी वर्तन विकसित होण्यास कारणीभूत ठरते. ब्लिस्टीन व सहकाऱ्याच्यामते (2005), उबदार व प्रतिसादात्मक (दिशादर्शक पालकत्व) मातेमुळे मुलांमधील आक्रमक आणि समाजविरोधी वर्तन कमी होऊ शकते. थोडक्यात, दिशादर्शक माता मुलांमधील आक्रमक व समाजविरोधी वर्तनाबाबत प्रतिबंधात्मक भूमिका बजावू शकतात.

आतापर्यंत चर्चा केलेल्या पालकत्व शैलींपैकी, दुर्लक्षित पालकत्व शैलीचा समाजविरोधी वर्तन व गुन्हेगारी वर्तनाशी जवळून संबंध दिसतो. पण याचा अर्थ असा नाही की ही शैली गंभीर समाजविरोधी वर्तनासाठी कारणीभूत ठरतेच. कारण, पालकांव्यतिरिक्त कुटुंबामध्ये इतर आदर्श व्यक्ती असतात. ज्यांचे मुले अनुकरण करू शकतात. उदाहरणार्थ कुटुंबातील इतर व्यक्ती, नातेवाईक, शिक्षक,प्रशिक्षक, इत्यादी. याचबरोबर उदारमतवादी पालकत्व आणि हलक्या दर्जाचे पालकत्व गुन्हेगारी वर्तनाशी संबंधित असू शकते. अशा पालकत्व शैली सोबत वाढलेल्या मुलांमध्ये व स्व:नियंत्रण व आवेगावरील नियंत्रणाचा अभाव असतो. उदारमतवादी पालक मुलांमध्ये शिस्त निर्माण करण्यात व त्यांची देखरेख करण्यात अपयशी ठरतात. मुलांना प्रौढांप्रमाणे वागतात आणि परिपक्व होण्यापूर्वीच त्यांना प्रौढांप्रमाणे शिक्षा देतात.

**ब) पालकांची निगराणी/देखरेख (Parental Monitoring)**

मुलांमधील विचलित व समाजविरोधी वर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या पालकत्व शैलींवर पालकांच्या निगराणीचा प्रभाव असू शकतो. **आपल्या मुलांचे संवंगडी कोण आहेत? मोकळया वेळेत आपली मुलं काय करतात? आणि घराबाहेर असताना त्यांचा ठावठिकाणा याबाबतची पालकांमधील जागृकता म्हणजे पालकांची निगराणी होय** (Parental monitoring " Refers to parents awareness of their child's peer associated free-time activities and physical whereabouts when outside the home"- Snyder and Patterson, 1987). फॉस्को आणि त्यांचे सहकारी (2012) असे लिहितात, की ज्या पालकांना त्यांच्या मुलांच्या हालचालींची माहिती असते, मुलांच्या वर्तनावर लक्ष ठेवतात, आणि मुलांसाठी चांगल्या वातावरणाची निर्मिती करतात अशा पालकांच्या मुलांच्या वर्तनातून अनुकूल परिणाम दिसतात.

माध्यमिक शालेय वया दरम्यानची पालकांची मुलांवरील निगराणी अधिक गरजेचे असते. कारण या कालावधीत मुले पालकांच्या कमी तर समवयस्कांच्या सहवासात अधिक असतात (फॉस्को व सहकारी, 2012). त्यामुळे या काळातील मुलांमधील समस्या समवयस्कांच्या प्रभावातून उद्भवण्याची संभाव्यता अधिक असते. त्याकरिता या काळात प्रभावी पालकत्वाची अधिक गरज असते. पण दुर्भाग्यवश ती कमी पडते. अशा वेळी कुटुंबातील सदस्यांचे एकमेकांशी आणि मुलांशी असणारे नातेसंबंध मुलांच्या चुका सुधारण्यासाठी अधिक उपयुक्त ठरतात.

याच्याही पुढे मुलांवरील फक्त निगराणीपेक्षा मुलांच्या प्रकटीकरणातून पालकांना त्यांच्याविषयी अधिक चांगले ज्ञान होते (टिटॅन-विवर व सहकाऱ्यांनी 2013). कारण, आपण कोठे आहोत याची कल्पना मुले पालकांना देत नसतील तर मुलांची निगराणी करणे खूप कठीण असते. अशावेळी मुलांचे कुटुंबाशी असणारे जवळीकतेचे नातेसंबंध विशेषता: पालकांशी असणारे जवळीकतेचे नातेसंबंध मुलांची निगराणी

करण्यास सहाय्यक ठरतात. जी मुले पालकांच्या जवळ असतात अशीच मुले पालकांच्या मताचा आदर करतात. आणि अडचणीच्या वेळी त्यांची मदतही घेतात.

पालकांपैकी वडिलांचे व मुलांचे सकारात्मक नातेसंबंध मुलांच्या चुकीच्या आणि समाजविरोधी वर्तनाबाबत उपचाराच्या स्वरूपात काम करतात. त्यामुळे वडील मुलांपासून विभक्त असले तरी मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी, दोघांमधील नातेसंबंधांमध्ये स्थिरता असावी.

बऱ्याचदा मुलांना पालकांची निगराणी नकारात्मक आणि कटकटीची वाटते. अशा वेळी **संतुलित पालकत्व निगराणी** (Balance parental monitoring) पालक – पाल्यामधील तणाव कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते. कारण अतिनियंत्रण ठेवणाऱ्या पालकांच्या सूचना स्वीकारण्याची मानसिकता मुलांमध्ये कमी दिसते. हा संघर्ष किशोर अवस्थेच्या सुरुवातीस अधिक तर उत्तरार्धात कमी होतानाचा दिसतो. त्यामुळे किशोरावस्था संवेदनशील असते. अशा वेळी कुटुंबातील सदस्यांचे एकमेकांशी असणारे नातेसंबंध, एकमेकांना दिला जाणारा वेळ आणि सकारात्मक नातेसंबंध यावर प्रभावी पालकत्व अवलंबून असते.

पालकांच्या निगराणीच्या गुणवत्तेवर अनेक घटकांचा प्रभाव पडतो. जसे घटस्फोट, आर्थिक तणाव, नोकरी गमावणे, मानसिक आजारपण, मादक द्रव्यांचे सेवन किंवा पालकांचा मृत्यू इत्यादी. त्यामुळे प्रभावी पालकत्वासाठी शक्य तितक्या जोखीम घटकांवर पालकांनी नियंत्रण करण्याचा प्रयत्न करावा. याव्यतिरिक्त पालकांची निगराणी याचा अर्थ पालकांनी शारीरिक दृष्ट्या उपस्थित असणे असा नाही. कारण, इतर काळजीवाहू व्यक्ती जसे, आजी-आजोबा, मावशी इत्यादींचा निगराणीत सुद्धा मुलांचे संगोपन चांगल्या प्रकारे होते. याचबरोबर चांगले शेजारी हा घटकही देखील विसरून चालणार नाही. कारण काही संशोधकांना असे दिसून आले आहे की ज्या समुदायात मुलांच्या चुकीच्या वर्तनास इतर प्रौढाद्वारे विचारणा केली जाते अशा मुलांच्या गुन्हेगारी व समाज विरोधी वर्तनात निम्नता दिसून येते (सॅम्पसन, मोरनॉफ, आणि गॅनॉन-राउली, 2000).

**क) पालकांचे मानसिक आजारपण (मनोव्याधीकीशास्त्र) (Parental psychopathology)**

पालकांचे मानसिक आजारपण आणि मुलांचे विचलीत वर्तन यामध्येही जवळचा संबंध दिसतो. ज्या पालकांना, विशेषतः मातांना अवसादाची/उदासीनतेची समस्या असते. अशा मातांच्या मुलांमध्ये समाजविरोधी वर्तन, भावनिक अनियमन, निकृष्ट बोधनिक विकास इत्यादी सामाजिक भावनिक आणि वार्तनिक समस्यांची जोखीम अधिक असते. ज्या मातांना गर्भधारणे दरम्यान आणि मुले शैशावस्थेत असताना अवसादाची/उदासीनतेची समस्या असते. अशा मातांची मुले जशी मोठी होत जातात तसतसेच अनेक वार्तनिक समस्या दिसू लागतात व गुन्हेगारी वर्तनात गुंतल्याचेही दिसू लागते. मुलांच्या बाल्यावस्थेच्या सुरुवातीसच दोन्ही पालक अवसादग्रस्त असतील तर अशा मुलांमध्ये समस्याजन्य वर्तन विकसित होण्याची संभाव्यत: दिवसें दिवस वाढतच जाते.

पालकांचे मद्यपान देखील मुलांसाठी जोखमीचे ठरते. यामध्ये वर्तणूक समस्या, समाजविरोधी वर्तन आणि पुढे जाऊन मद्यपी बनण्याचा समावेश होतो. पण मातेपेक्षा पित्याद्वारे केल्या जाणाऱ्या मद्यपानाचा मुलांच्या समाजविरोधी वर्तनावर व कुसमयोजनावर अधिक प्रभाव पडतो.

## 2.3 - मानसशास्त्रीय जोखीम घटक (Psychological risk factors)

**अ) जवळीकतेचा अभाव (Lack of attachment)**

जॉन बोलबी (John Bowlby,1969) यांच्यामते मुलांची नंतरच्या जीवनातील सामाजिक नातेसंबंधाची गुणवत्ता सुरुवातीच्या अवस्थेतील शिशू आणि पालकांच्या नातेसंबंधावर अवलंबून असते. ब्रिटीश मानसशास्त्रज्ञ व मनोविकारतज्ज्ञ जॉन बोलबी (1907-1990) यांनी सामाजिक जवळीकता उपपत्ती मांडली. ज्यावर मानसशास्त्रामध्ये खूप चर्चाही झाली आणि पुढे कदाचित गुन्हेगारी वर्तन समजून घेण्यासाठी त्याची व्याप्तीही वाढली. जवळीकतेचे दोन प्रकार पडतात.

**1) सुरक्षित जवळीकता (Secure attachments)**

काही शिशु पालकांसोबत/त्यांच्या उपस्थितीत बिनधास्त खेळतात आणि नाविन्यपूर्ण वातावरणाचा आनंद घेतात. मात्र पालक बाहेर जाताच अस्वस्थ होतात. पण पालक पुन्हा परत येताच आनंद अनुभवतात. असे शिशु आपल्या पालकांसोबत/काळजीवाहू व्यक्तींसोबत सुरक्षितता अनुभवतात. यालाच सुरक्षित जवळीकता असे म्हणतात.

**2. असुरक्षित जवळीकता (Insecure attachment)**

या प्रकारची जवळीकता दोन प्रकारात मोडते **i) चिंतातूर जवळीकता (Anxious attachment) -** अशी मुले पालकांपासून विभक्त होण्याच्या भीतीने अस्वस्थ व चिंतातुर होतात. नवीन वातावरणत पालकांशी चिकटून राहतात (Ainsworth, 1979). पालक घरी परतात तेंव्हा त्यांच्याशी विचित्रपणे आणि वैरभावाने वागतात किंवा पालकांनी जवळ करताना रडतात. **ii) दुर्लक्षित जवळीकता (Avoidant attachment) -** अशी मुले पालकांच्या उपस्थितीत आणि अनुपस्थितीत सुद्धा अस्वस्थता अनुभवतात. पालकांपासून विभक्त होताना किंवा त्यांच्याजवळ येताना अशी मुले क्वचितच रडतात. शैशाअवस्थेतील जवळीकतेच्या अभावामुळे पुढे जाऊन प्रौढावस्थेत अशा मुलांमध्येही जवळीतेचा अभाव दिसतो (Adshead, 2002)

जवळीकतेच्या अभावामुळे निर्माण होणाऱ्या समस्या शिशुअवस्थेत काळजीवाहू व्यक्तींच्या अपुरेपणाचा/अक्षमतेचा प्रभाव असतात. DSM-5 (APA, 2013) नुसार शैशाअवस्थेतील व बाल्यावस्थेतील बालकांच्या पुरेश्या काळजी अभावी पुढे जाऊन त्यांच्यामध्ये प्रतिक्रियात्मक आणि निर्बंधित जवळीकता विकृती दिसून येते. **प्रतिक्रियात्मक जवळीकता विकृती (Reactive Attachment Disorder – RAD).** यामध्ये बालकांच्या वर्तनातून सामाजिक नकार दिसतो. काळजी घेणाऱ्या प्रौढांप्रति मुलांची भावनिक वंचितता दिसते. मुले काळजीवाहू व्यक्तीपासून दूरावा करू लागतात. **निर्बंधित सामाजिक सहभाग विकृती (Disinherited Social Engagement Disorder – DSED)**. या विकृतीमध्ये मुले अनोळखी प्रौढांसोबत सक्रियपणे जोडली जातात आणि त्यांच्याशी आंतरक्रिया करतात. या प्रकारच्या विकृतीत अनोळखी व्यक्तींसोबत संभाषण करणे धोकादायक नसते. कारण मुलांच्या वर्तनातून पालकांच्या अपुऱ्या काळजीची प्रचिती होणे आणि अनोळखी व्यक्तीबरोबर न कचवता जाणे या विकृतीच्या निदानासाठी उपस्थित असणे गरजेचे असते.

मेरी ऐन्सवर्थ (Mary Ainsworth,1979) यांच्यामते जे पालक/काळजीवाहू व्यक्ती संवेदनशील, मायाळू आणि प्रतिसादात्मक असतात आणि मुलांमध्ये जगाविषयी आत्मविश्वास निर्माण करतात अशी मुले पालकांसोबत जवळीकता अनुभवतात. एक प्रौढ म्हणून अशी मुले उत्तम नातेसंबंधांची निर्मिती करतात. इतरांविषयी सहानुभूती दर्शवितात आणि उत्तम स्व-नियम प्रदर्शित करतात (ॲन्सबॉर्न - Ansborn, 2008). अशा व्यक्तींची जोडीदारासोबतच्या आंतरक्रियेत अधिक सक्षमता आणि सहानुभूती दिसते. सामान्यत: असेही मानले जाते, शिशुअवस्थेमध्ये लाभलेली जवळीकता प्रौढावस्थेतील प्रणय नातेसंबंधामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

ऐन्सवर्थ व सहकार्याच्यामते (1979), दुर्लक्षित जवळीकता शैली असणाऱ्या शिशूंचे पालकही बऱ्याचदा अलिप्तता/अंतर राखून राहणारे आणि मुलांसोबतची जवळीकता टाळणारे असतात. परिणामतः अशा मुलांना प्रौढपणी जवळीकतेचे नातेसंबध प्रस्थापित करण्यात अडचणी येतात. असे पालक शिरजोर असतात. आणि मुलांप्रतिचे प्रेम व जवळीकतेत असातत्यता अशा पालकांमध्ये दिसते. आपले पालक आपल्या गरजांना कसे व केव्हा प्रतिक्रिया देतील याची काहीच कल्पना अशा मुलांना नसते. प्रौढपणी अशा मुलांना जोडीदारासोबत घनिष्ट नातेसंबधाची अपेक्षा असते पण जोडीदारासोबतच्या नातेसंबंधाबाबत सतत चिंतीत असतात.

वॉर्ड आणि त्यांचे सहकारी (1995) असे गृहीतक मांडतात, लैंगिक गुन्हेगारांच्या पालकांच्या प्रेमळ वर्तनात असातत्यता आणि मुलांच्या गरजा ओळखण्यात निकृष्टता असते. त्यामुळे अश्या गुन्हेगारांच्या प्रौढावस्थेतील नातेसंबंधात दुर्लक्षित जवळीकता शैली दिसते. निरोगी मानसशास्त्रीय जवळीकतेची चर्चा करताना **जवळीकता पालकत्व** (Attachment parenting) ही संकल्पना समोर येते. याला हेलिकॉप्टर पालकत्व (Helicopter parenting) असेही म्हणतात. काही पालक मुलांच्या विकासाच्या प्रत्येक अवस्थेत पूर्णपणे गुंतलेली असतात. अगदी किशोरावस्थेपर्यंत व त्याच्याही पुढे. जसे मुलांच्या वसतिगृहात वारंवार जाणे, मुलांच्या प्रत्येक समस्येत ढवळाढवळ करणे, इत्यादी. पण याला सकारात्मक पालकत्व म्हणता येत नाही. जवळीकतेच्या या चर्चेतून पालकत्व पालकत्व शैलीबरोबरच जवळीकता शैलीचा मुलांच्या विचलीत वर्तनाची संबंध असल्याचे स्पष्ट होते.

**ब) परानुभूती/तदनुभूतीचा अभाव (Lack of empathy)**

मुलांचा एखादा समूह खेळत असताना एखाद्या मुलास इजा होऊन रडत असल्यास आपणास असे लक्षात येईल की, काही मुले त्याच्या रडण्याकडे दुर्लक्ष करून खेळ चालू ठेवतात. तर काही तो ठिक आहे का? याची, चिंताग्रस्त होऊन विचारपूस करतात. या उदाहरणातील दुसऱ्या प्रकारचा मुलांच्या वर्तनातून परानुभुती व्यक्त होतानाची दिसते. संशोधनामध्ये परानुभूतीच्या दोन मिती दिसून आल्या आहेत.

i) **भावात्मक परानुभूती (Affective empathy) – इतरांप्रतिची काळजीची भावना आणि व्यक्तीचा त्रास (त्रस्तता) कमी करण्याच्या इच्छेने युक्त दिलेली भावनिक प्रतिक्रिया म्हणजे भावात्मक परानुभूती होय** (Affective empathy is an emotional response characterized by feeling of concern for another and desire to alleviate that persons distress - Young, Fox and Zahn- Waxler, 1999).

**ii) बोधनिक/बोधात्मक परानुभूती (Cognitive empathy) - स्व दृष्टिकोनाच्या पलीकडे जाऊन इतरांना त्यांच्या संदर्भ चौकटीतून समजून घेण्याची क्षमता म्हणजे बोधात्मक परानुभूती होय** (Cognitive empathy refer to the ability to understand a person from his or her frame offer reference rather than simply form one's own point of view)

जॉलिफ आणि फॅरिंगटन (2007) यांनी **भावात्मक परानुभूतीचा, इतर व्यक्तींच्या भावना अनुभवण्याची क्षमता** (The ability to experience another person's emotion) आणि **बोधात्मक परानुभूतीचा, इतरांच्या भावना समजून घेण्याची क्षमता** (The ability to understand another's emotion ) असा केला आहे. या दोन्ही एकांगी नसून व्यक्ती दोन्ही धारण करू शकतात.

परानुभूतीतील उणिवांचा व्यक्तीमधील सातत्यपूर्ण आक्रमक आणि समाजविरोधी वर्तनाशी संबंध दिसतो. उदाहरणार्थ निम्न भावात्मक परानुभूतीचा मनोविक्षिप्ततेशी (Psychopath) संबंध दिसतो. ज्यामध्ये समाजविरोधी आणि हिंसक वर्तनामध्ये गुंतुन राहण्याच्या व्यक्तीच्या प्रवृत्तीशी संबंधित मानसिक व वार्तनिक घटकांचा एकत्रित समावेश असतो. आश्चर्याची बाब म्हणजे अशा व्यक्ती इतरांच्या भावना समजू शकतात (बोधात्मक परानुभूती). पण इतरांच्या भावना अनुभवण्यास (भावात्मक परानुभूती) अक्षम असतात. याच बरोबर परानुभूतीतील उणिवेस आचरण विकृती (Conduct disorder) आणि समाजविरोधी व्यक्तिमत्व विकृती (Antisocial personality disorder) मधील प्रमुख वार्तनिक वैशिष्ट्य मानले जाते.

मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये या दोन्ही मितींची प्रचिती वयाच्या दुसऱ्या वर्षापासूनच येऊ लागते. जी किमान किशोराअवस्थेपर्यंत येते. पण मुलींमधील परानुभूतीची वैशिष्ट्ये मुलांमध्ये व विरुद्धार्थी मुलांची मुलीमध्ये असू शकतात. वयाचा विचार केल्यास परानुभूतीचा अभाव आणि आक्रमक वर्तन यातील संबंध प्राथमिक शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच मुला - मुलींमध्ये दिसू लागतो. जो वयानुसार अधिक प्रबळ बनत जातो.

हल्लीच्या काही अभ्यासामध्ये भावात्मक परानुभूतीतील उनिवेचा हिंसक व सातत्यपूर्ण गुन्हेगारी वर्तनाशी घनिष्ठ संबंध दिसून आला आहे. कारण इतरांच्या भावना समजून घेण्यापेक्षा त्या अनुभवण्याची व्यक्तीमधील अक्षमता स्त्री-पुरुषांमध्ये दिसून येणाऱ्या हिंसकतेशी अधिक संबंधित असते. तसेच गुन्ह्याचे प्रमाण उच्च असणाऱ्या स्त्री-पुरुष गुन्हेगारांमध्ये निम्न भावात्मक परानुभूती दिसून येते. मुळातच अशा व्यक्ती बळी पडलेल्या व्यक्तीच्या वेदना अनुभवण्यास अक्षम असतात. मात्र सध्याचे अभ्यास या मतास म्हणावी तितकी पुष्टी देत नाहीत (बॅकोन आणि सहकारी, 2014). त्यामुळे निम्न भावात्मक परानुभूती आणि आक्रमक वर्तन याविषयी निष्कर्ष काढताना काळजी घेणे गरजेचे आहे. कारण आक्रमक व हिंसक वर्तनात निम्न परानुभूती बरोबरच इतर घटकही कारणीभूत असू शकतात.

- **प्राणी क्रूरता (Animal Cruelty)**

काही संशोधनांमध्ये व्यक्तिमधील परानुभूतीचा अभाव आणि प्राणी क्रूरता यामध्ये संबंध दिसून आला आहे. **सामाजिक दृष्ट्या अस्वीकृत व हेतुपुरस्कर केलेले वर्तन जे प्राण्यांमधील अनावश्यक वेदना, दुःख, त्रास आणि मृत्यूसाठी कारणीभूत ठरते त्याला प्राणी क्रूरता असे म्हणतात** (Socially unacceptable behavior that initially causes unnecessary pain suffering or distress to and/or death of an animal - *Guymer, Mellor, Luk and Pearson, 2001*)

प्राणी क्रूरता आणि मानवी हिंसकता यातील संबंध स्पष्ट करणारे अनेक अभ्यास झाले आहेत. स्टाऊ थमर- लोबर आणि तिचे सहकारी (2004) यांनी केलेल्या 13 ते 25 वयोगटातील पुरुषांच्या अभ्यासामध्ये प्राणी क्रूरता, हिंसक गुन्हेगारी वर्तनाचे प्रबळ पूर्वकथन करत असल्याचे दिसून आले आहे. लूसीअ आणी किल्लीअस (2011) यांनी सातवी ते नववीचा 3600 स्वीस विद्यार्थ्यांच्या केलेल्या अभ्यासात 12% विद्यार्थ्यांनी प्राणी क्रूरता वर्तन केल्याचे मान्य केले. तसेच प्राणी क्रूरता दाखवणाऱ्या तरुणांमध्ये गंभीर आंतरवैयक्तिक हिंसकतेची संभाव्यता ही तीन पट अधिक असते. राईट हेन्संले (2003) यांना बाल्यावस्थेतील मुलांमध्ये दिसणारी प्राणी क्रूरता आणि साखळी हत्येमध्ये (Serial Murder) संभाव्य संबंध दिसून आला. यांनी अभ्यासलेल्या पाच प्रसिद्ध गुन्हेगारांनी प्राण्यांचा छळ आणि हत्या करण्यासाठी वापरलेली पद्धतच

साखळी हत्येसाठी सुद्धा वापरल्याचे दिसले. अरलुकी आणि मडफीस (2014) यांना 43% शालेय नेमबाज, मांजर कुत्री यांच्याप्रती विनाकारण क्रूरता दर्शवितानाचे दिसले.

पण प्राणी क्रूरता आणि हिंसकता यातील संबंध स्पष्ट करणारे सध्याचे अभ्यास इतकेसे प्रबळ व पुरेसे नाहीत. कारण प्राणी क्रूरता हिंसकतेचा एक घटक असून मानवी हिंसे बाबत एक धोकादायक घटक म्हणून पाहता येईल. पण गंभीर हिंसक गुन्ह्याबाबत एक पूर्वकथन घटक म्हणून पाहता येणार नाही (वॉल्टर्स2013-14). कारण बोधनिक व व्यक्तिमत्व घटक, दुरुपयोगाची तीव्रता, क्रूरतेचे वय इत्यादी घटक सुद्धा हिंसक व आक्रमक वर्तनासाठी कारणीभूत असू शकतात. त्यामुळे परानुभूतीचा अभाव हा एकमेव जोखिम घटक मानता येणार नाही.

**क) अवधान दोष अतिक्रियाशीलता विकृती (Attention Deficit Hyperactivity Disorder - ADHD)**

मुलांमधील गुन्हेगारी वर्तनाच्या विकासामध्ये जनुकीय, मज्जाशास्त्रीय आणि स्वाभाविक घटक महत्त्वपूर्ण ठरतात. अतिक्रियाशीलता संलक्षणासच (Hyperactive syndrome) किमान मेंदू कार्यत्मकता (Minimal bran function), अतीगतीशीलता (Hyperkinesias), अवधान दोष विकृती (Attention deficit disorder) आणि सध्या अवधान दोष अतिक्रियाशीलता विकृती(ADHD) म्हणून ओळखले जाते. यामध्ये पुढील प्रमुख तीन वार्तनिक घटकांचा समावेश होतो.

1. **अनवधान (Inattention)**: एकाग्रतेचा अभाव किंवा सहजपणे विचलित होणे.
2. **आवेगशीलता (Impulsivity):** विचार करण्यापूर्वीच क्रिया करणे, एका क्रियेवरून दुसऱ्या क्रियेवर लगेच स्थलांतरित होणे (चंचलता).
3. **अति किंवा अमर्याद कारक हालचाली (Excessive motor activity)**: शांत/ स्तब्ध न बसणे, अस्वस्थता, सतत पळत राहणे, बडबडी व आवाज करणारी.

तर काही विद्वानांच्या मते (उदा. फ्रिक आणि निग्ग, 2012) ADHD च्या दोनच मिती दिसतात. अनअवधान आणि अतिक्रियाशीलता. अमेरिकन मुलांमधील ADHD हे एक प्रमुख निदान आहे. पूर्व शालेय वयात मुलांमध्ये याची लक्षणे दिसू लागतात. विशेष करून मुलांमध्ये. मुले आणि मुलींमध्ये याचे प्रमाण 3:1 दिसून येते. शिक्षण तज्ञांच्या मते अशा मुलांमध्ये एका कार्यावर टिकून राहणे, बोधनिक दृष्ट्या संघटित राहणे, शैक्षणिक संपादन टिकून ठेवणे इत्यादी कार्यात कठीणता येतात. ADHD बाबत असा एक समज आहे की एकदा ही विकृती विकसित झाली की त्याची लक्षणे प्रौढावस्थेपर्यंत टिकून राहतात. पण अशी बरीच मुले पुढे जाऊन यशस्वी होतात आणि गुन्हेगारी वर्तना पासून दूर राहतात. आणि अशा बऱ्याच प्रसिद्ध व्यक्ती आहेत ज्यांचे ADHD म्हणून निदान झाले होते पण आज त्या यशस्वी व्यक्ती आहेत.

1. अल्बर्ट आईन्स्टाईन (Albert Einstein) - जर्मन भौतिकशास्त्रज्ञ.
2. डवीगट आयरोनहोवर (Bwight D Eisenhower) - अमेरिकेचे 34 वे राष्ट्राध्यक्ष.
3. बिल गेट्स ( Bill Gates) - मायक्रोसॉफ्ट चे सर्वेसर्वा.
4. बुफी गोल्डबर्ग (Whoopi Goldberg) - अमेरिकन कलाकार.
5. मायकल फिल्पस (Michael Phelps) - अमेरिकन जलतरणपट्टू.
6. स्टीवन स्पीलबर्ग (Steven Spielberg) - अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक.
7. वॉल्ट डिस्ने (Walt Disney) - अमेरिकन कार्टून इंडस्ट्रीचे जनक.
8. जॉन लीनन (John Lennon) - इंग्रजी गायक, गीतलेखक.
9. अँन बॅनक्रॉफ्ट (Anna Bancroft) - अमेरिकन महिला अभिनेत्री.
10. टेरी ब्रँडशॉ (Terry Bradshaw) - अमेरिकन फुटबॉलपट्टू.
11. रिचर्ड बायर्ड (Richard Byrd) - अमेरिकन नौदल अधिकारी.
12. अँड्रयू कार्नेगी (Andrew Carnegie) - अमेरिकन उद्योजक.
13. रॉबिन विल्यम्स (Robin Williams) - अमेरिकन अभिनेता.
14. अगाथा क्रिस्टी (Agatha Christie0 - इंग्रजी लेखिका.
15. लुडविक बीथओवेन (Ludwig Beethoven) - जर्मन संगीतकार आणि पियानो वादक.

यु एस मधील 17 वर्षाच्या तरुण शालेय मुलांमध्ये ADHD चे संभाव्य प्रमाण 11 टक्के होते. ज्यामध्ये मुलांमध्ये, मुलींच्या तुलनेत याचे प्रमाण अधिक (3:1) होते (Center for disease control and prevention, 2014). हल्लीच्या काही वर्षामध्ये मुला – मुलींमधील या विकृतीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतानाचे दिसते. पुढील तकत्यातून हे स्पष्ट होते

तक्ता क्रमांक 2.1

| **साल** | **मुला – मुलींमधील प्रमाण (%)** |
|---|---|
| 2003 | 7.8 |
| 2007 | 9.5 |
| 2011 | 11.0 |

मात्र मुलांच्या (12.09,%) तुलनेत मुलींमध्ये (5.6%) याचे प्रमाण कमी दिसते (www.cdc.gov). प्रौढांमध्ये याचा प्रादुर्भाव जवळपास 5 टक्के आहे (Kesster et. al., 2006). याचबरोबर ज्या मुलांच्या जैविक नातेवाईकांना ADHD आहे त्यांच्यामध्ये या विकृतीचे निदान अधिक सामान्यपणे होते. मेंदूतील अपकार्य दोषामुळे हल्ली या विकृतीकडे, स्व नियमन आणि भावनिक नियमन विकृती म्हणून अधिक पाहिले जाते. ADHD मुळे निर्माण होणारे आक्रमक आणि समाजविरोधी वर्तन बऱ्याचदा आवेगशीलतेतून आणि धोक्याच्या संवेदनातुन निर्माण होते (Connor et. al., 2012). ADHD असणाऱ्या मुलांमध्ये बालगुन्हेगारी आणि समाज विरोधी वर्तनाची जोखीम अधिक असते. ADHD वर उपचार न झाल्यास, ही मुले जसजशी मोठी होतात तसतसे त्यांच्यामध्ये मादक द्रव्यांच्या दुरूपयोग, मद्यसेवन, समाजविरोधी वर्तन, शारीरिक इजा इत्यादी दिसू लागते/शकते (Stern, 2001). सद्यस्थितीचा आढावा घेतल्यास, सध्या ADHD साठी उपचार घेत असलेल्या 2 ते 17 वयोगटातील मुलांचे स्वरूप पुढील आकडेवारीतून स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक 2.2

| **वयोगट** | **उपचाराचा प्रकार** | **उपचार घेणाऱ्या मुलांचे प्रमाण (%)** |
|---|---|---|
| 2 ते 17 | औषधोपचार | • वय वर्षे 2–5: 18%<br>• वय वर्षे 6–11: 69%<br>• वय वर्षे 12–17: 62%<br>**एकूण = 62 %** |
| | वार्तनिक उपचार | • वय वर्षे 2–5: 60%<br>• वय वर्षे 6–11: 51%<br>• वय वर्षे 12–17: 42%<br>**एकूण** = 47 **%** |
| | औषधोपचार व वार्तनिक उपचार (एकत्रित ) | • जवळपास 30% मुलांनी फक्त औषधोपचार घेतले<br>• जवळपास 15% मुलांनी फक्त वार्तनिक उपचार घेतले<br>• जवळपास 32% मुलांनी औषधोपचार व वार्तनिक उपचार (एकत्रित )घेतले<br>**एकूण** = 77 |
| | कोणताही उपचार घेत नाहीत | 23 |

(www. cdc.gov)

- **ADHD ची कारणे काय आहेत? (Causes)**

तशी ADHD ही गोंधळात टाकणारी विकृती आहे. कारण याची कारणे अनभिज्ञ आहेत. काही शास्त्रज्ञाच्यामते, अशा मुलांमध्ये अतिक्रियाशीलतेची जैविक प्रवणता जन्मताच असते. तर काहींच्यामते अशा मुलांना धोकादायक वातावरणीय घटकांना सामोरे जावे लागते. ज्यामुळे त्यांच्या मज्जासंस्थेस इजा पोहचते. पूर्वशालेय वयामध्ये विषारी घटकांना सामोरे जावे लागल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम मुलांच्या मज्जासंस्थेवर होतो. याचा अभ्यास रॉल्फ लोबेर (Rolf Lober, 1990) यांनी केला. ज्यामध्ये त्यांना असे दिसून आले, की  शिसे मिश्रित रंग, शिसे मिश्रित माती इत्यादी निम्न विषबाधेस सामोरे जावे लागणारी मुले अधिक क्रियाशील, आवेगशील, सहज विचलित होणारी व विफल होणारी असतात. अगदी साध्या सूचनांचे पालन करणेही अशा मुलांना कठीण जाते.

काही संशोधकांच्यामते, अशा मुलांना शालेय जीवनामध्ये आंतरक्रिया करण्यासाठी प्रभावी युक्त्यांचे संपादन व आवश्यक बोधात्मक संघटन करता येत नाही. नवीन माहिती हाताळताना बोधात्मक संघटनाचा अभाव या मुलांमध्ये दिसतो. त्याचबरोबर स्व-नियमनाचा अभावही या मुलांमध्ये दिसतो. **स्वतः चे  वर्तन नियंत्रित करण्याची क्षमता म्हणजे स्व-नियमन होय** (Self-regulation refers  to the ability to control one's own behavior). कोणतेही बोधनिक कार्य करण्यासाठी अवधान, निरोधन आणि संघटन गरजेचे असते. याचीच उणीव या मुलांमध्ये दिसते. डग्लस (Douglas) यांच्यामते, अशा मुलांची स्व-नियमन प्रक्रिया सुधारण्यासाठी उत्तेजक औषधे फायदेशीर ठरतात. मात्र ही औषधे अधिक विवादास्पद असल्याची दिसतात.

ADHD ची मुले इतरांसाठी त्रासदायक असतात असे मानले जाते. पण वास्तविकत: इतरांशी आंतरक्रिया करताना चिडचिड, विफलता, इत्यादी निर्माण होणार नाही याची पुरेपूर दक्षता ही मुले घेतात (Henker and Whalen, 1989). अशा मुलांच्या वर्तनातून आक्रमकता दिसल्यास समवयस्कांद्वारे त्यांना नाकारले जाते. अशा मुलांच्या पालकांच्यामते, इतर मुलांच्या तुलनेत या मुलांना मित्र बनविणे कठीण जाते (CDC, 2014) आणि विकासाच्या अनेक टप्प्यात (वर्षात) हा नकार त्यांना सहन करावा लागतो (Murray-Close et., 2010; Reid, 1993). संशोधनानुसार अशा जवळपास 52 ते 82 टक्के मुलांना समवयस्कांद्वारे नाकारले जाते ( Hoja et. al., 2005; Murry- Close et al., 2010)

- **ADHD आणि गुन्हेगारी वर्तन  (ADHD and criminal behavior)**

काही संशोधकांनी (उदा. Pfiffner, McBurnett, Rathouz and Judice, 2005) असा अंदाज व्यक्त केला आहे की ADHD ने ग्रस्त मुलांपैकी एक चतुर्थांश मुले बाल्यावस्थेत व किशोरावस्थे दरम्यान गंभीर समाजविरोधी वर्तनात आणि प्रौढावस्थेत गुन्हेगारी वर्तनात गुंतली होती. टेरीफ मोफीट यांच्यामते ADHD ने ग्रस्त बऱ्याच मुलांमध्ये किशोरावस्थेच्या सुरुवातीसच बालगुन्हेगारी वर्तन दिसते. व असेही नमूद केले की वय वर्ष 5 ते 7 मधील ADHD गुन्हेगारी वर्तन असणाऱ्या मुलांना सामाजिक नातेसंबंध निर्माण करण्यात अडचणी आल्या. व किशोरावस्थेपर्यंत सातत्यपूर्ण गुन्हेगारी वर्तनाची संभाव्यता अधिक राहिली. तज्ञ देखील हे मान्य करतात. बालगुन्हेगारी आणि मादक द्रव्यांचा उपयोग ADHD शी संबंधित असणाऱ्या सामान्यपणे समस्या आहेत. आणि उपलब्ध माहिती देखील हेच सुचविते ज्या तरुणांमध्ये ADHD आणि समाजविरोधी वर्तनाची लक्षणे असतात त्यांच्या मध्ये दीर्घकालीन गंभीर गुन्हेगारी वर्तन विकसित होण्याची जोखीम देखील अधिक असते. डेवीड फॅरिंगटन यांना देखील हिंसक गुन्हेगारांमध्ये अतिक्रियाशीलता, आवेगशीलता आणि अवधान दोष समस्येची पार्श्वभूमी असल्याचे दिसून आले.

सामान्य लोकसंख्येच्या तुलनेत सुधारगृहातील (Correctional Facilities) ADHD चा प्रादुर्भाव 3 ते 10 पट अधिक आहे. अगदी स्पष्टपणे सांगायचे झाल्यास सामान्य लोकसंख्येच्या तुलनेत तुरुंगातील पाच टक्के पुरुष कैद्यांमध्ये याचे प्रमाण 11.7 ते 45 टक्के, तर महिला कैद्यांमध्ये हे 10 ते 18.5 टक्के दिसते (Connor et. al., 2012). याच्याही पुढे सुधारगृहातील कैद्यांच्या तुलनेत तुरुंगातील कैदी व्यत्ययजन्य, नियमांचे उल्लंघन आणि आवेगशील वर्तनामध्ये अधिक गुंतलेली असतात. त्यामुळे सुधारगृहात आणि तुरुंगामध्ये असणाऱ्या ADHD च्या कैद्यांमध्ये पुनर्वसन, अपयश, शैक्षणिक अपयश, व्यावसायिक अपयश, पुढे जाऊन समाजविरोधी वर्तन, मादक द्रव्यांचे सेवन, मानसिक व अध्ययन विकृती आणि आवेगशील आक्रमकतेची जोखीम वाढते.

**ड) आचरण विकृती (Conduct Disorder – CD)**

ADHD आणि आचरण विकृती बऱ्याचदा एकत्रित उद्भवतात. पण असे असले तरी दोन्ही विकृती स्वतंत्र आहेत. बऱ्याचदा बाल्यावस्थेच्या सुरुवातीस ADHD मधून बालकांची प्रगती होत असते तोवर अप्रभावी आणि दंडात्मक पालकत्वामुळे मुलांमध्ये आचरण विकृतीची सुरुवात दिसू लागते. बऱ्याच एकत्रितपणे उद्भवणाऱ्या विकृती, मानसशास्त्रीय व जैविक घटकांची वातावरणीय परिस्थितीशी झालेल्या आंतरक्रियेतून उद्भवतात. त्यामुळे मुलांचा वैकासिक अवस्थेतील निरोगी विकास अधिक महत्त्वपूर्ण ठरतो.

**सातत्यपूर्ण गैरवर्तनाने युक्त वर्तन समूहांचा संच ज्यामध्ये गुंडगिरी, मारामारी, इतरांना धमकावण्यासाठी शस्त्रांचा वापर, प्राणी व मानवाप्रति शारीरिक क्रूरता, संपत्तीची नासधूस, जूनाट लबाडीपणा, लैंगिक छळ आणि नियमांचे गंभीर उल्लंघन इत्यादीचा समावेश होतो याला आचरण विकृती असे म्हणतात** (Conduct disorder represents a cluster of behaviors characterized by persistent misbehavior including bullying, fighting, using or threatening weapons use on others, physical cruelty to people and animals, destruction of property, chronic deceitfulness, sexual assaults and serious violations of rules- APA, 2013)

आचरण विकृती विविध मानसशास्त्रीय समस्यांशी संबंधित आहे (Frick & Nigg, 2012). यामध्ये मानसिक आरोग्य समस्या (उदा. मादक द्रव्यांचा दुरुपयोग), कायदेशीर समस्या (उदा. अटक होण्याची भिती), शैक्षणिक समस्या (उदा. शाळा सोडणे), सामाजिक समस्या (उदा. निकृष्ट वैवाहिक समायोजन), व्यावसायिक समस्या (उदा. नोकरीतील निकृष्ट कामगिरी) आणि शारीरिक आरोग्य समस्या (उदा. निकृष्ठ श्वसनक्रिया) इत्यादींचा समावेश होतो. तरुणांमधील आचरण समस्या बऱ्याचदा कौटुंबिक आणि शालेय जीवनातील व्यत्ययाच्या स्वरूपात उभरते. जी मुलांमधील हिंसकता व गुन्हेगारी वर्तनास कारणीभूत ठरते. जसे चोरी करणे, आग लावणे, घरातून पळून जाणे, शाळा सोडणे, संपत्तीची नासधूस करणे, मारामारी करणे, खोटे बोलणे, आणि मानव व प्राण्यांप्रती क्रूरता इत्यादी. **DSM – 5 (APA, 2013) नुसार, इतरांच्या मूलभूत अधिकारांचे पुन्हा पुन्हा व सातत्याने उल्लंघन करणारे वर्तन किंवा वयाला अनुसरून असणाऱ्या सामाजिक मानदंडांचे उल्लंघन हे आचरणे विकृतीचे मुख्य वैशिष्ट्य आहे.** याचे सौम्य (खोटे बोलणे, धमकावणे, संध्याकाळी विनापरवानगी घराबाहेर राहणे, इतर नियमांचे उल्लंघन करणे), मध्यम तीव्र (चोरी, नासधूस करणे) आणि तीव्र (लैंगिक अत्याचार, शारीरिक क्रूरता, चोरीसाठी शस्त्रांचा वापर करणे, घरफोडी करणे) असे तीन विभागात वर्गीकरण होते.

DSM -5 मध्ये आचरण विकृती दोन विभागात वर्गीकृत करण्यात आली आहे. **1) बाल्यावस्थेतील आचरण विकृती** (Childhood – **Onset type) -** यामध्ये गैरवर्तनाची सुरुवात वय वर्ष 10 च्या अगोदर झालेली असते. आणि **2) किशोरावस्थेतील आचरण विकृती (Adolescent-Onset type) -** या प्रकाराची सुरुवात किशोरावस्थेत होते. बाल्यावस्थेतील प्रकारात बऱ्याचदा सौम्य आचरण समस्या पूर्वशालेय व प्राथमिक शालेय अवस्थेच्या सुरुवातीस दिसतात. आणि याची तीव्रता बाल्यावस्थेत व किशोरावस्थेपर्यंत वाढत राहते. DSM – 5 नुसार, आचरण विकृतीची सुरुवात जरी पुर्वशालेय वयात होत असली तरी याचे पहिले लक्षण मध्य बाल्यावस्था ते मध्य किशोरावस्थेच्या दरम्यान दिसते, आणि वय वर्ष 16 नंतर याची सुरुवात दुर्मिळपणेच दिसते. त्यामुळे, आचरण विकृतीची सुरुवात बाल्यावस्थेत झाल्यास मुलांमधील जोखीम अधिक बळावते. पण किशोरावस्थेत उद्भवल्यास इतकी जोखीम वाढत नाही. कारण मुले परिपक्व झालेली असतात. त्यामुळे कोणत्याही गैरवर्तनात गुंतत नाहीत.

आपण सुरुवातीस पाहिले आहे की बाल्यावस्थेतील आचरण विकृतीची सुरुवात, मज्जामानसशास्त्रीय दोष व बोधात्मक दोषाशी व त्याचबरोबर कौटुंबिक संघर्ष व अस्थिरता व सदोष पालकत्वाची घनिष्ठपणे संबंधित आहे. पण या सर्वांचा मुलांच्या समाजीकरण प्रक्रियेवर आणि कौशल्य विकासावर परिणाम होतो. ज्यामुळे कुटुंबाबाहेरील व्यक्तीसोबत मिळून-मिसळून राहण्यात अडचणी येतात.

एकूण काय तर, 2 ते 10 टक्के यू.एस. मधील बालके व किशोरांमध्ये असे वार्तनिक आकृतिबंध दिसतात. ज्याचे निदान आचरण विकृती म्हणून होऊ शकते (APA , 2013; Eddy, 2003; Frick, 2006). किशोरावस्थेच्या पूर्वी मुलींच्या तुलनेत मुलांमध्ये याचे प्रमाण 1:4 तर, किशोरावस्थेदरम्यान 1:2 दिसते (Frick , 2006). तसेच बाल न्यायालयात जाण्यापूर्वी तरुणांमध्ये आचरण विकृतीचा कलंक लागण्याची संभाव्यता असते (Lahey et. al. 1995). तसेच मुलींबाबत आजीवन समस्यांचे आगाऊ सूचक आचरण विकृती ठरू शकते. ज्यामध्ये

समवयस्क किंवा जोडीदाराशी निकृष्ट आंतरवैयक्तिक नातेसंबंध, गुन्हेगारी क्रिया, जोडीदाराच्या आधाराशीवाय लवकर गर्भधारणा होणे, नोकरी गमावणे/काढून टाकणे इत्यादींचा समावेश होतो.

**ई) विरोधी बेफिकीर वर्तन विकृती (Oppositional Defiant Disorder – ODD)**

आचरण विकृती आणि विरोधी बेफिकीर वर्तन विकृती ला बऱ्याचदा व्यत्ययजन्य वर्तन विकृती (Disruptive Behaviour Disorder – DBD) असे म्हणतात. आणि काही वेळा ADHD चा ही व्यत्ययजन्य वर्तन विकृतीमध्ये समावेश होतो.

आचरण विकृती (CD) आणि विरोधी बेफिकीर वर्तन विकृती (ODD) मध्ये फरक करायचा झाल्यास, DSM - 5 नुसार, आचरण विकृतीत मुख्यत्वे वर्तन नियंत्रित करण्यात तर काही वेळा भावना नियंत्रित करण्यात अडचणी येतात. तर ODD मध्ये भावना व वर्तन असे दोन्हींचे नियंत्रण करण्यात अडचणी येतात.

DSM - 5 ने ODD च्या मुलांच्या वर्तनाचे वर्णन वयापेक्षा अधिक नकारात्मक, विरोधी, खुनशी आणि उद्धट असे केले आहे. असे वर्तन किमान सहा महिन्यापासून दिसते. DSM - 5 नुसार अशा बालकांच्या व किशोरांच्या वर्तनातून नेहमी रागाचा उद्रेक, वाद-विवाद, खुनशीपणा, संताप आणि अवज्ञा दिसून येते. काही संशोधकांच्या मते चिडचिडेपणा हा या विकृतीचा मुख्य गाभा (मिती) आहे (Burke et al., 2014). मुलांमधील हा वार्तनिक व भावनिक आकृतीबंध पालक, शिक्षक, वर्गमित्र, मित्र किंवा प्रौढांच्या दिशेने निर्देशीत होऊ शकतो. मुलांमधील या विकृतीचे निदान होण्याकरिता वय लिंग व संस्कृतीस अनुसरून असणाऱ्या मानदंडापेक्षा मुलांच्या नकारात्मक वर्तनाची तीव्रता अधिक असणे अपेक्षित आहे. बऱ्याचदा आचरण विकृती ODD च्या लक्षणाविना दिसून येते. त्यामुळे ODD ही एक सामान्य बालवयीन व किशोरवयीन विकृती असून मुले जसजशी मोठी होतात तसतसे या विकृतीची लक्षणे नाहीशी होतात (Maughan, Rowe, Messer, Goodman and Meltzer, 2004). ODD च्या प्रारंभिक लक्षणातून आचरण विकृतीच्या आरंभाचे भाकीत होते (Burke et al., 2014). पण गुन्हेगारी वर्तनाचे भाकीत होते का हे स्पष्ट (अनभिज्ञ) नाही (Burke et al., 2014; Burke, Waldman and Lahey, 2014). काही संशोधने सुचवितात ODD पुढील दीर्घकालीन समाजविरोधी व गंभीर गुन्हेगारी वर्तनासाठी कारणीभूत ठरत नाही. तथापि बाल्यावस्थेतील ODD द्वारे किशोरावस्थेतील व प्रौढावस्थेतील समायोजन समस्येचे भाकीत होते (Frick and Nigg, 2012). पुढील उदाहरणांमधून ADHD, CD, ODD आणि गुन्हेगारी वर्तनाचे पूर्वकथन चांगल्या प्रकारे होते. "गुन्हेगारी प्रौढ मुलांच्या वैकासिक प्रवासाची सुरुवात प्रारंभिक शिशुअवस्थेतील अतिक्रियाशीलतेने होते, पुढे पूर्व शालेय वयात ODD, प्राथमिक शालेय वयात CD ची सुरुवात, किशोरावस्थेत मादक द्रव्य सेवन विकृती आणि प्रौढावस्थेत समाज विरोधी व्यक्तिमत्व" (Beauchaine et al., 2010). नक्कीच हि वैकासिक मार्गक्रमणा केवळ काही तरुणांसाठी लागू असू शकते आणि संपूर्ण जीवन प्रवासात असे काही मध्यस्थ सुरक्षा घटक निर्माण होतात जे या परिणामांना कमी करू शकतात/तटस्थ बनवू शकतात. त्यामुळे वेळीच प्रतिबंधात्मक युक्त्या न वापरल्यास या विकृतीमुळे मुलांच्या वैकासिक व सामाजिक विकासामध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

तक्ता क्रमांक 2.3

**गुन्हेगारीसाठीचे वैकासिक जोखीम घटक (Developmental risk factors for delinquency)**

| **सामाजिक वातावरणीय जोखीम घटक** (Social Risk Factors) | **मानसशास्त्रीय जोखीम घटक** (Psychological Risk Factors) | **पालकत्व आणि कौटुंबिक जोखीम घटक** (Parental and Family Risk Factors) |
|---|---|---|
| 1. गरीबी<br>2. समवयस्कांनी नाकारणे<br>3. समाजविरोधी समवयस्कांशी संबंध<br>4. अपुरी पूर्वशालये सुश्रुषा<br>5. अपुरी शाल्येपश्चात सुश्रुषा<br>6. शैक्षणिक अपयश | 1. परानुभूतीचा अभाव<br>2. जवळीकता विकृती<br>3. प्राणी क्रूरता<br>4. बोधनिक व भाषिक दोष<br>5. निम्न बुद्धिगुणांक/मनोमितीय बुद्धिमत्ता<br>6. अवधान दोष अतिक्रियाशीलता विकृती (ADHD)<br>7. आचरण विकृती (CD)<br>8. विरोधी बेफिकीर वर्तन विकृती (ODD) | 1. एक – पालक कुटुंब<br>2. उदारमतवादी आणि हलक्या दर्जाची पालकत्व शैली<br>3. पालकांच्या देखरेखीचा अभाव<br>4. पालकांचे मानसिक आजारपण<br>5. शारीरिक व मानसिक दुरुपयोग<br>6. कौटुंबिक हिंसा आणि मादक द्रव्यांचा दुरुपयोग<br>7. समाजविरोधी भावंडे |

**यातील काही घटकांचा प्रबळ परिणाम होत असला तरी, यातील कोणताही एकमेव घटक गुन्हेगारी/समाजविरोधी वर्तनास कारणीभूत ठरत नाही.*

## स्वाध्याय

**खलील दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

1. गुन्हेगारी दंड साहित्याचे उल्लंघन करणारे वर्तन म्हणजे ........होय.
   अ) गुन्हेगारी ब) सामाजिक क) मानसिक
2. गुन्हा करणाऱ्या व्यक्तीच्या वर्तन व मानसिक प्रक्रियांचा अभ्यास ...... शास्त्र करते.
   अ) मानसशास्त्र ब) समाजशास्त्र क) गुन्हेगारी मानसशास्त्र
3. अशी कोणतीही गोष्ट ज्यामुळे व्यक्तीची आणि होण्याची संभाव्यता वाढते त्यास......म्हणतात.
   अ) सुरक्षा घटक ब)सामाजिक घटक क) जोखीम घटक
4. जोखीम घटकांचे संभाव्य हानीकारक परिणाम कमी करणारा कोणताही घटक म्हणजे .......घटक होय.
   अ) संरक्षक ब) जोखीम क) सामाजिक
5. शब्दांद्वारे/ टाळाटाळ करून अथवा इतर अशारीरिक पद्धतींचा वापर करून इतरांना दुखावण्याची/ त्यांचा सामाजिक दर्जा कमी करण्याची व्यक्ती मधील प्रवृत्ती म्हणजे .....आक्रमकता होय.
   अ) नातेसंबंधात्मक ब) सामाजिक क) व्यक्तिगत.
6. विशिष्ट संदर्भ किंवा परिस्थिती च्या पलीकडे जाऊन मुलांनी विशिष्ट शैक्षणिक सामाजिक किंवा क्रीडा विषयक ध्यायचे साध्य करावी यासाठी पालकांनी द्वारे वापरल्या जाणाऱ्या युक्त्या म्हणजे......कौशल्य होय.
   अ) पालकत्व ब) पालक शैली क) पारंगत.
7. पालकांची त्यांच्या मुलांप्रतीची अभिवृत्ती आणि पालक-बालक नातेसंबंधातील भावनिक वातावरण युक्त पालक-बालक आंतरक्रिया म्हणजे ..... होय.
   अ) पालकत्व कौशल्ये ब) पालकत्व शैली क) पालकत्व.
8. पालकत्व शैलीचे प्रकार यांनी..... सांगितले.
   अ) बुमरिंड ब) म्यास्टन क) फ्रोईड
9. ....... यांनी मत्सर व हलक्या दर्जाची पालकत्व शैली सांगितली.
   अ) बुमरिंड ब) स्नायडर क) पटिरसान .
10. आपल्या मुलांचे सवंगडी कोण आहेत, मोकळ्या वेळेत काय करतात आणि घराबाहेर असतानाचा त्यांचा ठावठिकाणा या बाबतची पालकांमधील जागृतता म्हणजे......होय.
    अ) निगरानी ब) जागरूकता क) शिथिलता.
11. ...... यांनी सामाजिक जवळीकता उपपत्ती मांडली.
    अ) जॉन बॉलबी ब)जेम्स स्नायडर क) फास्को व त्यांचे सहकारी
12. इतरां प्रतीची काळजीची भावना आणि व्यक्तीचा त्रास कमी करण्याच्या इच्छेने युक्त दिलेली भावनिक प्रतिक्रिया म्हणजे .....समानुभूती होय.
    अ) भावात्मक ब) बोधनिक क)भावात्मक- बोधनिक.
13. स्व - दृष्टिकोनाच्या पलीकडे जाऊन इतरांना त्यांच्या संदर्भ चौकटीतून समजून घेण्याची क्षमता म्हणजे.....समानुभूती होय.
    अ) बोधनिक ब)भावनिक क) सामाजिक.
14. इतरांच्या भावना....... क्षमता म्हणजे समानुभूती होय.
    अ)अनुभवण्याची ब) समजून घेण्याची क) दुर्लक्ष करण्याची.

15. सामाजिक दृष्ट्या अस्वीकृत व हेतूपुरस्पर केलेले वर्तन जे प्राण्यांमधील अनावश्यक वेदना,दुःख, त्रास आणि मृत्यूसाठी कारणीभूत ठरते त्यास ........ क्रूरता म्हणतात.
    अ) मानव ब) मानव क) हिंसक.
16. अतिक्रियाशीलता हे .....चे एक लक्षण आहे.
    अ) ADHD ब) CD क) ODD.
17. DSM-5 नुसार इतरांच्या मूलभूत अधिकारांचे पुन्हापुन्हा व सातत्याने उल्लंघन करणारे वर्तन/ सामाजिक वयाला अनुसरून असणाऱ्या सामाजिक मानदंड याचे उल्लंघन विकृतीचे लक्षण आहे.
    अ) आचरण ब) ADHD क) ODD.
18. बाल्यावस्थेतील आचरण विकृतीत गैरवर्तनाची सुरुवात वय वर्ष ..... पूर्वी होते.
    अ) 10 ब)12 क) 08.
19. समन्वयकांनी नाकारणे हा ...... जोखीम घटक आहे.
    अ) सामाजिक ब) मानसिक क) कौटुंबिक.
20. जवळीकतेचा अभाव हा ....... जोखीम घटक आहे.
    अ) मानसशास्त्रीय ब) सामाजिक क) कौटुंबिक.
21. पालकांच्या निगराणीचा अभाव हा .....जोखीम घटक आहे.
    अ) कौटुंबिक ब) सामाजिक क) मानसिक.

**टीपा लिहा.**

1) पालकत्व शैल्या

2) पालकांची निगराणी

3) जवळीकतेचा अभाव

4) समानभुतीचा अभाव व प्राणी क्रूरता

5) अवधान दोष अतिक्रियाशीलता विकृती

6)आचरण विकृती

7) विरोधी व बेफिकिरी वर्तन विकृती.

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

1) जोखीम घटक म्हणजे काय सांगून सामाजिक जोखीम घटक स्पष्ट करा.

2) पालकत्व आणि कौटुंबिक जोखीम घटकांचे वर्णन करा.

3) मानसशास्त्रीय जोखीम घटकांचे थोडक्यात वर्णन करा.